म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

वा. नं. २८०, ओ

१५

काव्य

नं. १५

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय |
|---|
| काव्य |
| संग्रहालय क्रमांक |
| १०८० |

लेखक महादेव गो. शास्त्री

सन १८८०

पुस्तकाचें नांव प्राकृत काव्यांचे १०८०

पाहिले पुस्तक

# FIRST BOOK
of
# MARATHI POETRY

Translated from the first book of English Poetry, by the Director of Public Instruction

By

MAHADEO GOVIND SHASTREE,

Dy. Inspector

POONA
Printed at the Dnan Prakash Press
1860
Price 5 Annas

# प्राकृतकवितेचें पहिलें पुस्तक.

मेहेरबान् डायरेक्टर आफ् पब्लिक् इन्स्त्रक्शन्
यांच्या इंग्रेजी कवितेच्या पहिल्या पुस्तकावरून
**महादेव गोविंद शास्त्री**
डेपुटीइन्स्पेक्टर शाळा जिल्हा पुणें व सातारा
यांनीं केलें,

तें

पुणें एथील ज्ञानप्रकाश छापखान्यांत
छापिलें.

इसवी सन १८५०
शके १७८२

किम्मत ५ आणे

॥ ॐ श्री ॥

श्रीकृष्ण गोपालकृष्ण [illegible]

यांचे [illegible] पत्रिका कार्य [illegible]

श्रीमि [illegible]

[illegible]

१ का. काव्य ८८

# प्रस्तावना.

कोणत्याही भाषेंत पाहिलें असतां भाषेचा उत्तम परिणाम कविता होय. कवितेमध्यें जे नाना प्रकारचे रस व अलंकार असतात त्यांचें यथार्थ ज्ञान झालें असतां फार संतोष होतो, आणि तिच्या अभ्यासानें मनाची शक्ति वाढून भाषाही प्रौढ आणि रसभरित होते. प्राकृत भाषेमध्यें कविता करणारे मुकुंदराज, ज्ञानेश्वर, तुकाराम, मोरोपंत आदिकरून जे प्राचीन आणि अर्वाचीन कवि होऊन गेले त्यांच्या सुरस कवितांतील वेंचे काढून त्यांचा रा. रा. परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांणीं एक नवनीत ह्या नावाचा ग्रंथ केला आहे त्यावरून प्राकृत

भाषेंतील कवितांचा मासला कळण्यांत येतो, आणि त्याच गृहस्थांनीं दोन संस्कृत नाटकांचीं प्राकृत भाषांतरें केलीं आहेत, त्यांवरून संस्कृतांतील कवितेचाही मासला लक्षांत येतो. परंतु इंग्रेजी कवितेंतील मासला एतद्देशीय लोकांस अद्यापि कळला नाहीं तो कळावा ह्या हेतूनें हें इंग्रेजी कवितेचें पद्यात्मक भाषांतर केलें आहे.

हें भाषांतर केवळ शब्दास शब्द देऊन केलें आहे असें नाहीं, तर मूळ कवितेंतील अर्थ तात्पर्य न सोडितां स्थलविशेषीं न्यूनाधिक्य करून केलें आहे.

हें पुस्तक मुख्यत्वें करून शाळांतील मुलांकरितां आहे, म्हणून ह्यांतील कविता जि-

अ/ ८१।२५०

तक्या बालबोध करवल्या तितक्या केल्या आहेत, आणि जेथें जेथें कठिण शब्द पडले आहेत, तेथें तेथें त्यांचा अर्थ समजण्याकरितां त्या त्या पृष्ठाच्या खालच्या अंगास टिपा घातल्या आहेत. ह्याकरितां शिक्षकानें मुलांच्या शक्तिप्रमाणें त्यांस एक अगर अर्धी कविता अर्थासहित तयार करून आणावयास सांगावें, आणि त्यांची नींत परीक्षा घेऊन ज्या ठिकाणीं त्यांस पूर्ण अर्थ समजला नसेल त्या ठिकाणीं तो त्यांस समजून देऊन, प्रत्येक कविता अर्थासहित मुलांस पक्की समजली अशी शिक्षकाची खात्री झाल्यावर, ती ज्या चालींत लिहिलेली असेल त्या चालींत त्यांच्या कडून पाठ करवावी.

कविता करण्याचा हा प्रथमच प्रसंग आहे, आणि कविता शक्ति जशी असावी तशी नाहीं, ह्याजकरितां ह्या कवितेंत अर्था विषयीं व शब्दाविषयीं ज्या चुक्या पडलेल्या असतील त्यांकडे तादृश लक्ष न देतां गुणलेशा वर नजर देऊन ह्या पुस्तकाचा आदर करावा ही विद्वानांस प्रार्थना आहे.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.


उद्योग. — १
बहीण भावंडांची प्रीति. — २
मुंग्या — ४
मुंगी. — ६
इहलोकीं आपलें कर्तव्यकर्म. — ८
पाण्याचा धबधबा आणि सदागुलाब. — १०
बुलबुलपक्षी आणि सोनकिडा. — १४
लार्ड विल्यम. — १७
मनुष्याची योग्यता त्याच्या मनावर असते. — ३०
वसंत ऋतूचें भाषण. — ३२
जेलर्ट ह्या नावाचा कुतरा. — ३६
स्काटलंड देशांतील हिंवाळा. — ४५
इंग्लंड देशांतील घरें. — ४९
ताडाचें झाड. — ५२
तारुण्य दशेंतील उमेदी. — ५५
व्यायाम. — ५८
नित्यकर्में. — ५९
इंग्लंड देशांतील खलाशी लोक. — ६०

# अनुक्रमणिका.

| | पृष्ठ. |
| --- | --- |
| बूक. | ६२ |
| मित्रवियोग. | ६५ |
| ट्रंबू केपनामक खडकावरील घांट. | ६७ |
| उद्योग. | ७४ |
| मेलेल्या मुलाच्या सुंदर पुतळ्यावरून सुचलेली गोष्ट. | ७७ |
| चमत्कारिक न्याय. | ८१ |
| काजवा. | ८६ |
| परस्परांनीं परस्परांवर दया करणें हा मुख्य स्वाभाविक धर्म. | ८७ |
| कोडें. | ९५ |
| रेशमी किडा. | ९७ |
| निरुपद्रविक चोर. | ९९ |
| गोगलगाय. | १०१ |

# प्राकृत कवितेचें पहिलें पुस्तक.

## उद्योग १

### श्लोक.

पाहाही मधुमक्षिका लघुपरी कैशी सदा कष्टते ॥
कालाची हरएक सप्रभ[1]घटी कार्या कशी लाविते ॥
जाऊनी अवघ्या प्रफुल्लित फुलांमध्यें कशी शिरते ॥
जोडाया मधुला समग्रदिनही पाहा कशी राबते ॥ १ ॥
पाहाही चतुरपणेंच अपुलें पोळें कसें बांधिते ॥
मेणातें निटनेटकें पसरुनी छिद्रें कशी पाडिते ॥
कैशी त्यांत भरावयास अपुलें मिष्टान्न ती भोंवते ॥
हें पाहूनि मला खरोखरचि नी ज्ञानी अशी भासते ॥ २ ॥

---

१. प्रभायुक्त घटिका. २. मध. ३. शाहाणी.

ऐशी ही कृति पाहुनी मनिं गमे कर्तव्य करावी अशी॥
जी भारी श्रमसाध्य आणि बहुधा जी युक्तिनें साध्यशी॥ ३॥
जों वेरी असतात हातं अगदीं क्षमाविणें वारिते॥
तों वेरी कधिं नाहीं नाश करण्या वांचूनि राहात ते॥ ४॥

---

## बहीण भावंडांची प्रीति. २

### अभंग.

कज्जे कफावती, होवोत रस्त्यांत॥
असावी घरांत, शांति मोठी॥ १॥
बहीण भावंडें, नांदती ज्या स्थळीं॥
नसावा वा कळि तेथें कधिं॥ २॥
पक्षी ही लाहान, घरटीं बांधोनी॥
गुण्या गोविंदानीं, राहाता ती॥ ३॥

---

१ कलह. २ गोडी गुलाबीनें.

मग जीं शाहाणी, बाळकें आहेत ॥
त्यांमध्यें व्हावेत, कज्जे काय ॥ ४ ॥
उरवाव्या पारवाव्या, काढूनी भांडावें ॥
वर्दळीस यावें, त्यांणीं काय ॥ ५ ॥
एकामेकांवरी, दांत ओंठ खाणें ॥
नाहीं लाजिरवाणें त्यांस काय ॥ ६ ॥
देवराया आतां, लेंकूर बुद्धीचा ॥
झपाटा रागाचा, माफ करा ॥ ७ ॥
आणखी आमुच्या, रागाच्या लहरी ॥
काढाव्या बाहेरी, मनांतूनि ॥ ८ ॥
इतर जे मळ, संतापाशी मूळ ॥
धुवोनी समूळ, टाका तेही ॥ ९ ॥
जैसे जैसे आह्मी, प्रौढ वया येऊं ॥
भरूनियां जाऊं प्रेमानंदें ॥ १० ॥

हीच आहे तूज, मागायाची गोष्ट ॥
होऊनी संतुष्ट द्यावी आम्हां ॥ ११ ॥

---

## मुंग्या. २
### आर्या.

अपुल्या नेत्रें बघतां, किति या मुंग्या लहान दिसतात ॥
फिरतां पायांखालीं, चिरडुनियां त्या धुळीस मिळतात ॥१॥
ऐशा योगें त्यांचे, रोज थव्याचे थवेच मरतात ॥
परि कोणी सांग बरें, त्यांची परवा कधीं हि करतात ॥२॥
जरि त्या ऐश्या अपुल्या, दृष्टीनें क्षुद्र पदार्थशा दिसती ॥
जरि त्यांच्या स्थितिरीति, व्यवहारीं ग्राह्य फारशा असती ॥३॥
आपण सुजाण आहों, तरिबारे आपणांमध्येंहि किती ॥
निघतील मूर्ख ज्यांना, बोधक होतील बा तदीय कृती ॥४॥
झोपेमध्यें अथवा, खेळामध्यें कधींच पळ एक ॥

दवडित नाहित मुंग्या, समजुनि एकेकपळ अमोलीक ॥५॥
सूर्य प्रकाश पडतां, धान्याच्या संग्रहार्थ निघतात ॥
हेमंतऋतू करितां, त्याचा सांठा करूनि घेतात ॥६॥
एकाद्याला त्यांच्या, कामाचा बेतबात पाहूनी ॥
वाटेल कीं नसेलचि, कोणाला दूरदृष्टि याहूनी ॥७॥
हेमंतऋतूमध्यें, थंडी पडणार फार जाणोनी ॥
पूर्वींच करिति सांठा, अन्नाचा कण मुखांत आणोनी॥८॥
ज्या वस्तूंची मजला, भविष्यकाळीं पडेल बा गरज ॥
त्या मिळवाया जर मीं, केली नाहींच आज तजवीज॥९॥
अथवा संकटकाळीं, उपयोगाचा असा उपाय जरी ॥
केला नाहीं बारे, मूर्खपणें म्यां झटून आज तरी॥१०॥
मूर्ख असें निःसंशय, मी त्या हलक्याहि मुंगिच्याहुनही॥
कारण त्याचें सहजचि, सांगू सकशील बा स्वयें तूंही॥११॥
पहिली उमेद माझी, मी जरि ती व्यर्थ जाउं देईन ॥

तर मग दृढपणीं मी, निःसंशय फार हीन होईन॥ १२॥
जों वरि आहें बा मी, तरणा ताठा असोनि आरोग्य ॥
तोंवि विचार करूं दे, मजला बा पुढिल गोष्टि चा योग्य॥१३॥
म्यां आतां जाणावें, जर पीडिल रोग या शरीरास ॥
दूर कराया त्याला, समयास पडेल काय कामास॥१४॥
प्रार्थावें म्यां आतां, माझ्या करुणाब्धि देवरायाला॥
पापांच्या राशीची, माझ्या त्याणें क्षमा करायाला॥१५॥
म्यां आतां वाचावीं, धर्माचीं पुस्तकें रयन्या भावें ॥
त्यांतिल सदर्थ जाणुनि, विश्वासानें तसेंच वागावें॥१६॥
ऐशा आचरणानें, स्वर्गांतिल मंदिरास जोडीन ॥
जेव्हां मृत्युपथें मी, बा या पार्थिव कुडीस सोडीन॥१७॥

# मुंगी. ४
## आर्या.

एका लहान काळ्या, मुंगीला गवसला बहु थोर ॥
दाणा गोधूमाचा, परि उचलेना जरी करी जोर ॥ १ ॥
तेव्हां तेथें तीच्या, दृष्टिस पडला तिचाच शेजारी ॥
प्रार्थुन म्हणे तया हा गेहा[1] न्यायाशि दे मदत भारी ॥ २ ॥
माझें आहे मजला, कार्य पहाया असें वदे तोरें[2] ॥
आणि म्हणे इच्छिशि जरि, गे ने तो तूंच आपुल्या जोरें ॥ ३ ॥
ऐसें वदूनि चालू, झाला तो दुष्टबुद्धि अति गैर ॥
साह्य न करितां गेला, अपुल्या गेहीं निजावया स्वैरें[3] ॥ ४ ॥
इतुक्यामध्यें दुसरी, मार्ग क्रमितां पिपीलिका[4] आली ॥
गेली मदत कराया, संकटिं पाहूनि आपुली आली[5] ॥ ५ ॥

---

१ घराला. २ गर्वानें. ३ स्वच्छंदें. ४ मुंगी. ५ सखी.

पोंचवि तिला तिच्या त्या, गोधूमासह गृहास नेऊन ॥
दाखवि सुजनपणातें, ऐशा मोठ्या श्रमास घेऊन ॥ ६ ॥
ज्यांच्या ज्यांच्या श्रवणीं, पिपीलिकेची पडेल ही गोष्ट ॥
ते हलवोन कराया, बाळां तें बोध आपुले ओष्ट ॥ ७ ॥
ती सुस्वभाव मुंगी, गेली साह्यास जी स्वदृष्टान्त ॥
बोधकरो बाळां तें, जो होइल मान्य सर्व शिष्टांस ॥ ८ ॥
जरि करिती प्रेमातें, परस्परें जीव जंतु अतिनीच ।
तरि पाहिजे शिशूंच्या, मध्यें ती प्रेमबुद्धि असलीच ॥ ९ ॥

## इहलोकीं आपलें कर्तव्यकर्म. ५

### अभंग.

इहलोकीं आपुलें कर्तव्य कोणतें ॥
सांगतों मी तूतें ऐक आतां ॥ १ ॥

---

१ स्वसखीस. २ फार हलके. ३ मुलांच्या.

आरंभोनी आधीं चांगल्या कर्मांशीं ॥
त्याहूनी अधिकाशीं मग जावें ॥२॥
नंतर आपण सर्वोत्कृष्ट कर्म ॥
करूनी स्वधर्म जागवावा ॥ ३ ॥
ऐशा या कर्मानें काळ घालवावा ॥
आभार मानावा देवाजीचा ॥ ४॥
उत्तम नरदेह सत्कर्मी लावावा ॥
सुखें तो त्यागावा मृत्युपंथें ॥५॥
सत्कृत्यांचीं पुष्पें[1] तोडीत चि जावें ॥
सुवासा[2] सोडावें चोहींकडे ॥६॥
आपण केलेल्या परोपकाराचीं ॥
कृत्यें महत्वाचीं दयायुक्त ॥ ७ ॥

---

१ सत्कर्में करावीं. २ कीर्तीनें.

हृदयस्थ भानु मावळल्यावरी ॥
आठवोनी सारीं मोठ्या प्रेमें ॥ ८ ॥
आपुलें बा नाम लोकांनीं स्मरावें ॥
ऐसेंच वांचावें जगा माजी ॥ ९ ॥
सद्गुणाचें बीज पेरी एकपट ॥
होतें शतपट कालांतरें ॥ १० ॥

---

## पाण्याचा धबधबा आणि सदागुलाब.[१]

### आर्या.

रे जडशिरोमणे तूं, अभिमानाचीच वाटसी खाणी ॥
हो चल पलीकडे निघ, ऐशी गर्जे भयंकरा वाणी ॥ १ ॥

---

१ जीवात्मा.

तूं मी आणिक माझ्या, मार्गामध्यें बळें घुसायाला ॥
पाहुं नको मूर्खपणें, ऐसें त्या वापुड्या गुलाबाला ॥२॥
बोले बहु जबरीनें, पाण्याचा धबधबा बहू थोर ॥
आला होता अंगीं, बर्फ वितुकल्यामुळें बहूजोर ॥३॥
त्या धोताच्या फेनें, भरूनि गेलें समग्र झाडचि तें ॥
आणीक लागलें बहु, नाचायालाच खालतें वरतें ॥४॥
ऐशासमयीं त्याची, जी स्थिति झाली असेल ती अज्ञ ॥
बालक ही जाणाया, शकतिल मग कां न जे महासुज्ञ ॥५॥
रे नीचा माझा तूं, मार्ग निरोधावया पहाशील ॥
जरि तरि समज पुरें तूं, घातचि अपुला करून घेशील ॥६॥
ज्या खडकास तुझीं हीं, मूळें आहेत पूर्ण चिकटून ॥
त्या खडकासुद्धां ही, तुजला टाकिन बळेंच उपटून ॥७॥
यापरि त्या गर्विष्ठा, धोतानें गांजिलें गुलाबाला ॥
परि साहिलेंच मानुल, लवकर पावेल नाश तो घाला ॥८॥

मग त्या दुःखापासुन, सुटका जाणुनि अशक्य झाडानें।
केला धडा मनाचा, उत्तर धाया महा प्रयासानें ॥ ९॥

दूषण तूं मजलागीं, लावुन को बा उगीच अभिमानें ॥
ऐसें तें झाड ह्कू, बोले त्या धबधब्यास मानानें ॥ १०॥

ज्या जन्मभूमिकेवरि, केला आपण निवास हर्षांत ॥
तेथें आतां आपण, राहुन घे बा उगीच कलहांत ॥ ११॥

ज्यानें माझ्या अंगीं, प्रेमानें पसरिला महानंद ॥
त्या तुज कैसा एथुनि, मजला ढकलावयास आनंद ॥ १२॥

जैशी आई अपुली, बाळाला हलविते स्वसंतोषें ॥
तैसें तूं या माझ्या, शाख्येवर हलविलें मला तोषें ॥ १३॥

त्वां माझ्या पर्णाला, दिधली बहु आर्द्रता उन्हाळ्यांत ॥
अपुल्या उदकातें त्वां, सिंचुनि[1] माझ्या मुळ्यांत पाळ्यांत ॥ १४॥

---

१ पाणी देऊन.

हे उपकार तुझे मी, स्मरुनि मनीं बहु कृतज्ञ बुद्धीनें ॥
प्रत्युपकार कराया, चुकलों नाहीं बरें स्वबुद्धीनें ॥ १५ ॥
कांहीं फुलली कांहीं, नाहीं फुलली अशाच कुसुमाला ॥
अंगावरि घालुनियां, बहु डौलानें वसंत ऋतु आला ॥ १६ ॥
म्हणजे स्वीय फुलांच्या, हारानें भूषवूनि या खडका ॥
आली सन्निध सुदिनें, म्हणउनि सुचना करावया नडका ॥
॥ १७ ॥
चुकलों नाहिं कधीं मी, आणिक तुज सुखविलें उन्हाळ्याच्या ॥
दिवशीं आच्छादूनि, छायेनें बा रुवर्ण पुष्पांच्या ॥ १८ ॥
माझ्या पर्णीं बैसुनि, जीं आतां सर्व झडुनियां गेलीं ॥
बहु मधुर गायनें बा, तुज मजसाठींच कोकिळें केलीं ॥ १९ ॥
तूं जाणतोस झाला, तेणें जो आपणास बहु तोष ॥
जेव्हां थोडाहि तुला, अथवा नव्हता मुळींच बा घोष ॥
॥ २० ॥
नाहीं मजला ठाउक, काय पुढें बोलिलें चितें त्याला ॥
मोठ्या वेगें धांवत, रोरांवत धबधबा दरीं आला ॥ २१ ॥

मी ऐकाया अपुला, कान दिला पुढिल वृत्त बा कांहीं ॥
परि दुसरें त्यां कांहीं, वरि कथिल्या वाण ऐकिलें नाहीं ॥ ॥२२॥
तेव्हां थरथर कांपुन, ओरडलें झाड भिउन जाऊन ॥
भ्यालों मी हि तयाचे, ते शेवटचेच शब्द जाणून ॥२३॥

---

## बुलबुलपक्षी आणि सोनकिडा. ७

### आर्या.

बुलबुलनामक पक्षी, एक दिनीं फारवेळ गाऊन ॥
तोषवि पोरजनाला, गोड लकेऱ्या बहूत दाऊन ॥१॥
जरि अस्तमान होउनि, गेला आणिक रात्रही आली ॥
तरि नाहीं विश्रांती, मंजुळ लकिरा मधें किमपि झाली ॥ ॥२॥

### श्लोक.

असें गातां गातां सहज जठराग्नी खवळला ॥
मिळावें भक्षाया म्हणउनि पहायास वळला ॥

नशामध्यें तेथें अवचित किडा जो चमकला ॥
तयाला पाहूनी बुलबुल मनीं तो हरखला ॥ ३ ॥

अभंग.

अंधारांत त्याची चकाकी पाहूनी ॥
सोनकिडा मानी मनीं त्यास ॥ ४ ॥

आर्या.

तेव्हां खालीं उतरुनि, जावें त्याचा करावया घास ॥
ऐसा आणुनि चित्तीं, बुलबुल गेला धरावया त्यास ॥ ५ ॥

श्लोक.

असा जाणुनी भाव त्या कीटकानें ॥
बहू पाटवोक्ती करूनी तयानें ॥
महायुक्तिनें तोषवीलें तयाशी ॥
त्वरें आपुला जीव रक्षावयाशी ॥ ६ ॥

## आर्या.

आतां त्या वक्त्याचें, भाषण किति मृदु सुयुक्त तें पाहा ॥
तो निश्चयें करीलचि, ज्याच्या कानीं पडेल तें आहा ॥ ७ ॥

## श्लोक.

बहुत सुरस तूझ्या ऐकुनी गायनाला ॥
बहुत नवल होतें माझिया या मनाला ॥
वद मज तुजलाही पाहुनी दीपकाया ॥
नवल बहुत झालें नाहिं का पक्षिराया ॥ ८ ॥

## आर्या.

तरि माराया मजला, चित्त तुझें थरथरांत कांपेल ॥
भंगाया गान तुझें, मन माझें ही नसेंच तापेल ॥ ९ ॥
ज्या प्रभुनें तुजलाही, गायनशक्ती दिली महागाया ॥
त्याच प्रभुनें मजला, शक्ति दिली या असे प्रकाशाया ॥
॥ १० ॥

तरि तूं अपुल्या गानें, आणिक मी आपुल्या प्रकाशानें।
तोषवुनी भूषवुनी, घालवुं रात्री समग्र हर्षानें ॥१॥
ऐसें सुंदर भाषण, ऐकुनि तो त्याशि सोडिता झाला॥
मारुनि चार लकेऱ्या, वाकेऱ्या भक्ष्य शोधना गेला॥२॥

## लार्ड विल्यम. ८

लार्ड विल्यमाला एक भाऊ होता, त्याचें नांव लार्ड एड्मंड असें होतें, तो ज्या वेळीं मरूं लागला, त्या वेळीं त्यानें आपल्या एकुलत्या एके मुलाला विल्यमाच्या स्वाधीन केलें, आणि सांगितलें कीं, याचें तूं पुत्रा प्रमाणें पालन कर. परंतु लार्ड एड्मंड मरण पावतांच त्याची सर्व मालमत्ता आपणास मिळावी, या बुद्धीनें लार्ड विल्यमानें आपल्या पुतण्यास नदींत बुडवून ठार मारिलें. या अघोर कर्माचें

फळ त्यास काय प्राप्त झालें, तें या कवितेंत सां-
गितलें आहें.

## अभंग.

विल्यमानें लोभें एड्मंड बाळाला ॥
डोहीं बुडविला एक्या दिनीं ॥ १ ॥
एड्मंड बाळाला बुडविलें जेव्हां ॥
कोणीं नाहीं तेव्हां पाहीयेलें ॥ २ ॥
किंकाळ्या मोठ्यानें फोडिल्या ज्या तेणें ॥
नायकील्या कानें इतरांच्या ॥ ३ ॥
मग तो विल्यम झाला बा वारीस ॥
सर्व जीनगीस बांधवाच्या ॥ ४ ॥
ताबेदार होते सरदार आणीक ॥
मानिती मालक हिंसकाशी ॥ ५ ॥
सुंदर सुपीक ऐशा प्रदेशांत ॥

विल्यम राहात होता तेथें ॥ ६ ॥
त्याच्या त्या मंदीरा पासून नजीक ॥
सेवर्न नामक नदी वाहे ॥ ७ ॥
तिजला उदक होतें बा विपूल ॥
आणी तीचें कूळ फार मोठें ॥ ८ ॥
पण त्या प्रवाहाकडे पाहायाला ॥
विल्यम रायाला धीर नोहे ॥ ९ ॥
त्याला त्या लाटांच्या घोषांत बाळक ॥
एड्मंडाची किंक ऐकूं येई ॥ १० ॥
मध्यान्ह रात्रीच्या सामसूम वेळीं ॥
हिंसकाच्या डोळीं निद्रा येई ॥ ११ ॥

---

१ तट.

पण त्याचा डोळा लागला कीं पुरे ॥
स्वप्नाचे पसारे चालू होती ॥१२॥
स्वप्नामध्यें त्याला एड मंड बाळाची ॥
होती त्या फर्म्याची मूर्ती दीसे ॥१३॥
जातांची जाईना एकएक दीस ॥
वाटे त्वरें मास निघूनि गेले ॥१४॥
आणि तोची दीस पुन्हा परतला ॥
भयें जीव भ्याला विल्यमाचा ॥१५॥
ऐसा हा दिवस येईल शेवटीं ॥
होती त्याच्या पोटीं दहशत ॥१६॥
कारण तो दीस विल्यमाच्या मनीं ॥
गेला बा होवोनी वज्रलेप ॥१७॥
फार भयंकर होता तो दीवस ॥
पर्जन्य धारेस खळ नाहीं ॥१८॥

कानठळी बैसे ऐसे गडगडाट ॥
आणी कडकडाट वीजांचेही ॥१९॥
सवर्ने नदीस पाणी आलें फार ॥
झालें अपरंपार चोहींकडे ॥२०॥
विल्यम रायानें त्यादीनीं संदंभ ॥
केला समारंभ भोजनाचा ॥२१॥
मद्याचें प्राशान बहूत करून ॥
आणीक हांसून दीस घाली ॥२२॥
ऐसे बहुतची केले बा सायास ॥
दूर करायास चिंताज्वर ॥२३॥
परि कांहीं गोड नवाटे जीवास ॥
नाठवे विलास मनीं त्याला ॥२४॥

---

१ डोक्यांना.

म्हणूनी विल्यम रात्र झाल्यावरी ॥
गेला पलंगावरी निजायाला ॥२५॥
फार श्रमामुळें झोंप आली त्यास ॥
परी अंतरास सुख नाहीं ॥ २६ ॥
पलंगा समीप तयाच्या भावाची ॥
एड्मंड रायाची मूर्ती उभी ॥ २७ ॥
त्याला हूबेहूब तशी ती दीसली ॥
विकळ झालेली मरणकाळीं ॥ २८॥
अंतकाळ जेव्हां समीपची आला ॥
त्या काळीं निरवीला एड्मंडानें॥२९॥
आपुला मुलगा विल्यमाच्या हातीं॥
बोलला त्याप्रती येणें परी ॥ ३०॥
माझें हें पोरकें पोर आहे बाळ ॥
ह्याचा तूं सांभाळ करीं प्रेमें ॥ ३१॥

ऐसें सांगतांना शब्द उमटेना ॥
जिव्हाही वळेना एड्मंडाची ॥ २२॥
तयेवेळीं जैसें निस्तेज झालेलें ॥
तैसेंची दिसलें मुख आतां ॥ २३॥
विल्यमरायाला एड्मंड बोलला ॥
बरा सिद्धी नेला बोल माझा ॥ २४॥
आपुल्या करणी सारखें बा फळ ॥
शीघ्र पावशील निश्चयें तूं ॥ २५॥
ऐसें ऐकोनीयां उठला दचकून ॥
भयानें कांपून गेला भारी ॥ २६॥
जेव्हां ऐकूं आलें रात्रीचें तुफान ॥
तें त्याला गायन झालें जाण ॥ २७॥
तितुक्यांत एक मोठा शब्द झाला ॥
भेदूनीयां गेला हृदय त्याचें ॥ २८॥

रे राया विल्यमा ऊठ ऊठ वेगें ॥
भिंती वाहण्या जोगें पाणी आलें॥३९॥
घाईनें उठूनी भिंती खालीं पाहे ॥
पूर आला आहे ऐसें दीसे ॥ ४० ॥
मंदिराभोंवतीं पाडियेला वेढा ॥
अंधारही गाढा पडलासे ॥ ४१ ॥
मध्यान्ह रात्रीचा वेळ तेव्हां होता ॥
साह्यासही नव्हता कोणी तेथें॥४२॥
पडे तेव्हां कानीं आनंदाचा ध्वनि॥
नावही येऊनी थडकली ॥ ४३ ॥
तिला पाहोनीयां सर्वही मिळाले ॥
आणी गोळा झाले नावे भोंतीं ॥४४॥
माझी आहे नाव लाहानशी होडी ॥
ऐसें तो नावाडी बोलियेला ॥ ४५ ॥

हीमध्यें निभाव एकाचा लागेल ॥
दुज्यानें बुडेल होडी माझी ॥ ४६ ॥
रे राया विल्यमा त्यांचि आंन यावें ॥
ईश्वरें राखावें तूं जलाची ॥ ४७ ॥
नावाड्यानें वल्हीं मारीतांची नाव ॥
घेऊनीयां धांव गेली पुढें ॥ ४८ ॥
त्यानें एकाएकीं आरोळी ऐकीली ॥
त्यास नी भासली किंकाळीशी ॥ ४९ ॥
एड्मंड बाळाची बुडत्या वेळेची ॥
किंकाळी नयाची डूबे डूब ॥ ५० ॥
नावाडी थांबूनी म्हणतो मार्थूनी ॥
किंकाळीचा ध्वनि ऐकूं येतो ॥ ५१ ॥
ही किंक वाटते लाहान बाळाची ॥
करावी बा याची पुस्ताशास्त ॥ ५२ ॥

हा ध्वनि होतो रात्रीच्या वाऱ्यानें ॥
विल्यम रायानें जाब दिला ॥ ५३॥
चालूं दे लौकर चालूं दे लौकर ॥
झपाट्यानें मार वल्हीं तूझीं ॥ ५४॥
त्वरा करीं त्वरा नेईं पैल तीरा ॥
ऐसें त्या धीवरा राय बोले ॥ ५५॥
पुन्हा विल्यमानें किंकाळी ऐकिली ॥
एडमंडें जी केली बुडतेवेळीं ॥ ५६॥
नावाडी[१] हा पुन्हा नेमेंची बोलीला ॥
ऐकूं आली मला बाळकिंक ॥ ५७॥
कांहीं नाहीं नाव चालूं दे लौकरी ॥
ने बा पैल तीरीं झपाट्यानें ॥ ५८॥

---

१ नावाडी.

रात्र आहे पाहीं बहुत अंधारी ॥
शोध केला तरी व्यर्थ जाण ॥ ५९ ॥
रे राया विल्यमा जाणशी दुःखाच्या ॥
मरणकाळींच्या वेदना तूं ॥ ६० ॥
मरणकाळींच्या बाळ किंका ऐशा ॥
ऐकतोशी कैशा दुःखाविणें ॥ ६१ ॥
काय हें अघोर कर्म बूडण्याचें ॥
शीत प्रवाहाचे पोटामध्यें ॥ ६२ ॥
निर्जीव हाताला पुढें पसरणें ॥
आरोळ्या मारणें व्यर्थ आतां ॥ ६३ ॥
पुन्हा त्या किंकेचा ध्वनिआला कानीं ॥
मोठ्या सपाट्यानीं दुःखयुक्त ॥ ६४ ॥

---

१ शोध.

त्या क्षणीं दगाच्या बाहेर पडला ॥
चंद्र प्रकाशाला पूरावरी ॥ ६५ ॥
तेव्हां त्यास बाळ जवळी दीसलें ॥
उभें राहीलेलें खडपावरी ॥ ६६ ॥
खडप तो अगदीं लाहानची होता ॥
पाण्याच्या भोंवता वेढा मोठा ॥ ६७ ॥
नावाड्यानें नाव तेक्षणीं हांकीली ॥
लागलीच नेली खडपापाशीं ॥ ६८ ॥
चंद्रप्रकाशानें दाखवीलें नीट ॥
झालेलें फिकट तोंड त्याचें ॥ ६९ ॥
आतां राया तुझा हात दे तयाशी ॥
आणी बा प्राणाशी रक्षीं त्याच्या ॥ ७० ॥
नावाड्याचें ऐसें बोलणें ऐकून ॥
त्याणें हात जाण पुढें केला ॥ ७१ ॥

मग त्या बाळानें आपुले लहान ॥
हस्तक वा जाण पुढें केले ॥ ७२ ॥
त्याचा स्पर्श झाला रायाशीं ज्याकाळीं ॥
ठोकीलें त्याकाळीं आरोळीस ॥ ७३ ॥
त्याला ते हस्तक लागले बा गार ॥
आणी ओलसर प्रेतासन ॥ ७४ ॥
त्याला वाहू मध्यें एड्मंड बाळक ॥
वाटला गोळक जड बहू ॥ ७५ ॥
शिशाहून भारी वजन तयाचें ॥
पाहूनी रायाचें धैर्य खचें ॥ ७६ ॥
नाव बुडाली त्या अपार पाण्यांत ॥
हिंसकांसहीत खालीं गेली ॥ ७७ ॥

---

१ शिल्यमासहित.

उसळी मारूनी वरता तो आला ॥
आणी ओरडला मोठ्या स्वरें ॥७८॥
ऐकूं नाहीं गेली कोणाला ती किंक ॥
म्हणून आणीक तळीं गेला ॥७९॥
दुष्ट आचरण जे बा करितात ॥
शेवट होतात ऐसे त्यांचे ॥८०॥

---

## मनुष्याची योग्यता त्याचे मनावर असते.९

### ओंव्या.

जो केवळ वतनाची। शेंदा मिरवितो साची ॥
त्यास बा प्राप्ति सुखाची ॥ नाणी मनीं तूं ॥१॥
मोठ्या सुवर्णाच्या खाणी ॥ जमून एक्या ठिकाणीं॥
त्यास वाढवाया त्याणीं ॥ संकल्प केला ॥२॥

सोन्याच्या वाळूचे पाट ॥ जरी वाहती अचाट ॥
कुरणामाजी अफाट ॥ तयाचि या गा ॥ ३ ॥
तो शुद्र जन्म करंटा ॥ जाण पावूनियां थाटा ॥
तयाचे मनीं नाहीं सांठा ॥ महात्म नेचा ॥ ४ ॥
नभा[1] जाऊनि लागवे ॥ सागरा मुठीं घेववे ॥
ऐशी जरी वाढ पावे ॥ शरीर माझें ॥ ५ ॥
तरी ही तयाचें माप ॥ नाणावें मनीं उमाप ॥
विचारें तुज अपाप ॥ कळेल हेतु ॥ ६ ॥
नर देहाची मोजणी ॥ करावी आत्म्यावरुनी ॥
मनचि आहे मापणी ॥ मनुष्याची ॥ ७ ॥

---

१ आकाश.

## वसंत ऋतूचें भाषण. १०

### श्लोक.

बहू संभ्रमें मी अतां येत आहें ॥
अगे धाकुटे बालिके तूंचि पाहें ॥
अती सौख्यकारी रवीच्या करांनें ॥
शिरीं लेउनी तोषवाया जनांतें ॥१॥
मधू ही सवें आणिलें गोड पाहीं ॥
कराबी बहू तृप्ति त्या मक्षिकांहीं ॥
तसा घेउनी मी स्वयें मोहराशी ॥
पहा भूषवाया अलों गे तरूंशीं ॥२॥

### साकी.

सुंदर पुष्पें कोमल किसलय, घेउनि येतों पाहीं ॥
अतां यावया मला कन्यके, अवधी उरला नाहीं ॥३॥

आलों आलों जाण आता तूं, ऐसें वसंत बोले ॥
माझ्याकरितां मथमाशी ही, गुंगुं नाईं डोले ॥ ४ ॥
अतिशय सोज्वल आणिक सुप्रभ, पाहा या आकाशीं ॥
भरद्वाज हा उंच चालिला, घेऊनि उड्डाणाशी ॥ ५ ॥

## अभंग.

मच्छर ही पाहा उडाया लागले ॥
माझें येणें झालें जाण आतां ॥ ६ ॥
जाईची हीं झाडें पिवळ्या कळ्यांनीं ॥
भरूनियां रानीं शोभताती ॥ ७ ॥
शेवाळूनि झालीं आहेत गे फार ॥
देखे हिरवीचार नदी तटें ॥ ८ ॥
त्यावरी पांढरीं चांदण्या सारिखीं ॥
पुष्पें तूं निरखीं चोहींकडे ॥ ९ ॥
अनेक लाहान ओहोळ वाहाती ॥

न्वकाकी मारितो पाहा कीती ॥१०॥
उपवनीं पाहीं फळझाडें सारीं ॥
होऊनी पांढरीं गेलीं नीं तूं ॥११॥
लाहान कोंकरें वें वें करीताती ॥
उडया मारीता ती आनंदानें ॥१२॥
काव काव ऐसा शब्द करितानी ॥
काक मिळता ती एका ठायीं ॥१३॥
ऐक त्या काकांचा कलकलाट भारी ॥
जो हा तरूवरी चालल्लासे ॥१४॥
आणीक पाहीली पांढरी पांकोळी ॥
पाहा तूं गे डोळीं उडतांनां ॥१५॥
सर्व हें पाहूनी आणी गे तूं मनीं ॥
थोर करणी कोणीं केली ॥१६॥

Trinidad Baptist Women's Association



# ओंव्या.

पृथ्वी आणि आकाश मंडळ ॥
तूं आपुल्या डोळां पाही सकळ ॥
हा वसंतऋतु अतिनिर्मळ ॥
ईश्वरें दिधला तुजसाठीं ॥१७॥
पक्ष्यांस शिकविलें विश्वंभरें ॥
गाणीं गावया मधुर स्वरें ॥
नानापदार्थीं भूषविलें धरें ॥
नभा केलें अतिविमळ ॥१८॥
हें सर्व केलें तुझ्या स्वार्थ ॥
तुझ्याचि अन्नाच्छादनार्थ ॥
यास्तव मनीं धरुनि भावार्थ ॥
शरणजाई विश्वेशा ॥१९॥

# जेलर्ट या नांवाचा कुतरा.१

## अभंग.

एक्या सुप्रभातीं, पारधवाल्याला॥
शब्द ऐकूं आला तुतारीचा ॥१॥
तो शब्द ऐकूनी, पारधी उठला ॥
वाजवूं लागला शिंग स्वयें ॥२॥
कुत्र्या पारधींच्या, कुत्रे पारधींचे ॥
ऐकूनि शिंगाचे स्वर आले ॥३॥
पहिल्या ही पेक्षां, मोठ्यानें आपुलें॥
शिंग वाजविलें ल्वेलीनानें ॥४॥
तरी नाहीं आला, जेलर्ट नांवाचा॥
कुत्रा ल्वेलीनाचा सवें जाया॥५॥
जेलर्टा तुज कां, उशीर लागला॥
शिंग ऐकायाला माझें आज॥६॥

---

१ पारधकरणाराचें नांव

श्वानजातीमध्यें, दीपक जेलर्ट ॥
कोठें भटकत फिरत आहे ॥ ७ ॥
सत्य शौर्य आणि, विश्वास हे तीन॥
नांदती या गुण जेलर्टीत ॥ ८ ॥
मेंढी सारिखाची, गरीब घरांत ॥
परी पारधींत सिंह जैसा ॥ ९ ॥
ल्वेलीनाचें मन, लागेना त्या दीनीं ॥
पारधींत रानीं हरणाच्या ॥ १० ॥
पारध ही फार, नाहीं आली हाता ॥
जेलर्ट नव्हता म्हणूनियां ॥ ११ ॥
म्हणून ल्वेलीन, असंतुष्ट झाला ॥
आणि परतला घराकडे ॥ १२ ॥
दरवाज्याशीं त्याणें, पाहिलें आपुल्या॥
उनाड झालेल्या, जेलर्टाला ॥ १३ ॥

जेलर्टही तेव्हां, त्वरेनें धांवला ॥
जाऊन धन्याला भेटायाशी ॥ १४ ॥
ल्वेलीन तो जेव्हां द्वारापाशीं आला ॥
भिऊनियां गेला तया काळीं ॥ १५ ॥
कारण जेलर्ट, दिसला तो त्याला ॥
माखून गेलेला रगतानें ॥ १६ ॥
त्याच्या दांता ओंठापासून रगत ॥
होतें बा वाहात अतिशयें ॥ १७ ॥
कावरा बावरा, ल्वेलीन तो झाला ॥
पाहाया लागला टकमक ॥ १८ ॥
ऐसें जेव्हां रूप, जेलर्ट देखीलें ॥
चिन्ह झांकियेले स्वानंदाचें ॥ १९ ॥
आणि तो जेलर्ट, नमूनी राहिला ॥
चाटाया लागला पाय त्याचे ॥ २० ॥

पुढें तो त्वरेनें त्वेलीन चालला ॥
जेलर्टही गेला मागो माग ॥ २१ ॥
जिकडे पाहिलें, तिकडे दिसले ॥
ताजे पडलेले रक्तबिंदू ॥ २२ ॥
घरांत येतांची, प्रथम पाहिली ॥
उलटी झालेली बालशय्या ॥ २३ ॥
पलंग पोसही, रक्तें भरलेला ॥
फाटून गेलेला ऐसा होता ॥ २४ ॥
भोंवालच्या भिंती आणीक जमीन ॥
गेल्या त्या भरूनी रगतानें ॥ २५ ॥
ऐसें पाहूनीयां, कंबर खचली ॥
हाक मारियेली बाळकाशी ॥ २६ ॥
परी कोणी त्याला नाहीं ओ दिधली ॥
धडकी भरली मनामध्यें ॥ २७ ॥

इकडे तिकडे तो, शोधाया लागला॥
आपुल्या बाळाला तयेकाळीं ॥२८॥
जिकडे तिकडे, रगतचि असे ॥
कोठेही न दीसे बाळ त्याचें ॥२९॥
रे दुष्टा जेलर्टा, कैसा घात केला ॥
त्यांचि भक्षियेला बाळ माझा ॥३०॥
रागाच्या भरांत, ऐसा बोलियेला ॥
हात हो घालला तलवारीला ॥३१॥
ती त्याच्या कुशींत भोसकली त्यानें॥
घ्यावया उसनें जेलर्टाचें ॥ ३२॥
दीनवाणा जरी धरणीं पडला ॥
नाहीं द्रव आलावेलीनाला ॥३३॥
परी ऐकूं आलें जेव्हां जेलर्टाचें ॥
मरणकाळींचें केंकाटणें ॥३४॥

तेव्हां त्याचें मन गेलें धडकून ॥
दुःखानें भरून राहीयेलें ॥ ३५ ॥
इतक्यामध्यें त्या कोंकाटण्यामुळें ॥
बाळ जागें झालें निजलेलें ॥ ३६ ॥
जवळचि तेव्हां स्वर रडण्याचा ॥
ऐकिला बाळाचा त्वेलीनानें ॥ ३७ ॥
ऐकतांचि त्याला जो झाला उल्हास ॥
तो या वर्णायास शब्द नाहीं ॥ ३८ ॥
पूर्वी जलदीनें शोधाशोध झाली ॥
नाहीं दृष्टी गेली तयाकडे ॥ ३९ ॥
विरळांच्या ढीगाखालीं झुंडाळून ॥
गेल्यामुळें जाण दृष्ट नाले ॥ ४० ॥
सुंदर गुलाबी झोंप घेतल्यानें ॥
तें ताजें नवानें झालें होतें ॥ ४१ ॥

सुंदरनें बाळ अंकीं बैसविलें ॥
चुंबन घेतलें प्रेमें त्याणें ॥ ४२ ॥
ओरखडे आणि दुजी दुखापत ॥
नव्हती दिसत अंगावरी ॥ ४३ ॥
त्याच पलंगाखालीं लांडग्याचें प्रेत ॥
देखिलें अवचित ल्वेलीनानें ॥ ४४ ॥
चावूनी चावूनी होतें फाडलेलें ॥
विद्रूप झालेलें भयंकर ॥ ४५ ॥
जेव्हां तो लांडगा ल्वेलीनें पाहिला ॥
नाहीं त्या दुःखाला पारावार ॥ ४६ ॥
सत्य गोष्ट जेव्हां उदयास आली ॥
तेव्हां त्याची फिरली चित्तवृत्ति ॥ ४७ ॥
धन्याच्या वंशाचें मूल रक्षायाला ॥
जेलर्टें मारिला लांडगा तो ॥ ४८ ॥

त्वेलीनानें केला फार बा अनर्थ ॥
परि सारा व्यर्थ जाण आतां ॥ ४९ ॥
ऐशा परी त्याणें बहु शोक केला ॥
आणिक बोलला जेलटोला ॥ ५० ॥
श्वान जातीं मध्यें सर्वोत्तमा तूला ॥
माझा शेवटला राम राम ॥ ५१ ॥
ज्या वेडेपणाच्या कृतीनें तुजला ॥
भूतळीं पाडीला त्वेलीनानें ॥ ५२ ॥
तिचें प्रायश्चित्त तो स्वयें भोगील ॥
रुदन करील सर्वकाळ ॥ ५३ ॥
मग त्या श्वानाचें थडगें बांधियेलें ॥
त्यासें शोभविलें नकशीनें ॥ ५४ ॥
संगमरवरी दगडाच्या वर ॥
लिहिली बरवर जेलटोची ॥ ५५ ॥

त्या खोलीं तयाच्या अस्थींचा पंजर[१]॥
नेऊनि सुस्थिर ठेवीयेला ॥ ५६ ॥
जेव्हां तो पारधी थडग्याशीं येई ॥
भरोनियां जाई गहिंवरें ॥ ५७ ॥
थडग्याजवळ गचता बरते ॥
गळालेले होते अश्रु त्याचे ॥ ५८ ॥
तयाच्या नियोगें सर्व ठरें झालें ॥
दुःख मनांतलें त्वेलीनाच्या ॥ ५९ ॥
त्वेलीनें आपुलें शिंग आणि भाला ॥
टांगून ठेविला थडग्यापाशीं ॥ ६० ॥
आणीक बहुधा संध्याकाळ झाला ॥
म्हणजे वाटे त्याला ध्वनि होतो ॥ ६१ ॥

---

१ पिंजरा.

त्या बाधनीमध्यें शब्द केंकण्याचा॥
मरणकाळीचा जेल्टोंचा ॥ ६२ ॥
ऐकूं येतो ऐसा सदा होई भास ॥
तेणें मनत्रास पावे त्याचें ॥ ६३ ॥
अविचारानें बा करावें जें काम ॥
त्याचा परिणाम ऐसा होतो ॥ ६४ ॥

---

## स्काटलंड देशांतील
## हिंवाळा. १२
### आर्या

आतां शरदृतूंतिल, न रक्त[1]पर्णेंच कोठें कतां दिसती॥
या अपुल्या रानांतिल, मोठ्या मोठ्याहि टेंकड्या वरती॥
॥ १ ॥

---

१ तांबडींपानें

संध्याकाळीं त्यांचा, रंग निळाजांभळा जसा शारदीं[1]॥
फिरवी मागें आतां, नाहीं तैसें करीत ड्रीड[2] नदी ॥२॥
ही नीड[3]पाथ बाजू, पुष्पांनीं भरुनि जातसे सारी ॥
आतां पहा कशी ती, दिसते अगदीं उदास वा भारी ॥३॥
या येयॅर[4] शैलाचें, शृंग पहा बोडकें कसें दिसतें ॥
ऐसेंच या समोरिल, दो भगिनींचे[5] हि दृष्टिला पडतें ॥४॥
भेंट्या होउनि जर्जर[6], भारी त्या थंडिच्या कडाक्यांत ॥
जागेंत निवाऱ्याच्या, शिरती जाउन दऱ्यांत खोऱ्यांत ॥५॥
तेथें तृण कांहींसें, होतें अद्यापि पण सुकटलेलें ॥
पाणी हि अजुन होतें, परि तें मूळींच अटत आलेलें ॥६॥

---

१ शारदवृंत. २ हें नदीचें नांव. ३ हें विशेष नांव. ४ स्थानाचा पर्वत. ५ दोन टेकड्यांचें. ६ पीडित.

तीं शुष्क तृणाच्छादित[1], भूमी हिममेय तसेंच आकाश ॥
पाहुनि निराश होउनि, मेंढ्या लक्षुनि आपुला नाश ॥ ७ ॥
त्यांच्या पाठीं मागें, धनगर रक्षावयास जे येती ॥
ते शीतनिवारणास्तव, कंबल अंगीं लपेटुनी घेती ॥ ८ ॥
संतोषानें त्यांचे, कुतरे भोंतीं न मंडळें करिती ॥
पण कुडकुडून त्यांच्या, पाया पाशींच राहुनी फिरती ॥ ९ ॥
तो थंडगार वारा, जैसा जैसा अधीक घोंगावे ॥
तैसे त्या कुतऱ्यांनीं, भीतीनें पाहण्यास लागावें ॥ १० ॥
जीं पर्वतचर बाळें, बळ धैर्यें पाहिजेत असलींच ॥
तीं सर्व असुनि तीरीं, आहेत हो हुं हुं करीत बसलींच ॥ ११ ॥
डेजीनामक झाडें, पाहुनि तीं पुष्पहीन गहिंवरतीं ॥

---

१ गवतानें झांकलेली २ धुक्यानें भरलेलें. ३ थंडीच्या घालविण्यासाठीं ४ पोंगडी. ५ फेरे. ६ डोंगरांत राहणारे. ७ बाळें. ८ फुलांवांचून.

मनिं खेळ उन्हाळ्याचे, येतां दुःखास येतसे भरती ॥१२॥
मोठ्या उत्सुकतेनें, तीं बाळें प्रश्न हाचि करतात ॥
येईल मागुता का, वसंतऋतु सर्वतोषकर तात ॥१३॥
मेंढ्या आणिक पक्षी, संतोषानें भरून जातिल कीं ॥
हो थोरो झाडाला, सुंदर पुष्पें बहूत येतिल कीं ॥१४॥
होय मुलांनो पुनरपि, डेजीं झाडें सपुष्प होतील ॥
त्यांच्या रंगानें ही, लतागृहें फार रम्य दिसतील ॥१५॥
ज्या पुष्पांच्या माळा, करावयाचा तुम्हा असे छंद ॥
हो नाथांचीं पुष्पें, पुनरपि पाहूनि व्हाल सानंद ॥१६॥
या कुरणामध्यें बा, पुनरपि तीं कोंकरें हि उडतील ॥
भोंताले पक्षी ही, गाणीं बहु गोड गात बसतील ॥१७॥

---

१ उत्कंठेनें. २ सर्वांस आनंद देणारा. ३ बाबा. ४ झाडांचें नांव.
५ वेलीनीं छादित जागा.

यांच्या परीच तुमचें, मन जेव्हां खेळण्यांत लागेल ॥

तेव्हां तीं सुदिनेंही, क्षणांत गेलीं असेंच वाटेल ॥१८॥

---

## इंग्लंड देशांतील घरें. २६

### आर्या.

पाहा या भोंताल्या, मोठ्या मोठ्या जुनाट वृक्षांत ॥

शोभति सुंदर सदनें, कशिंया इंग्लंडनाम देशांत ॥१॥

या वृक्षांच्या तळच्या, हिरवटिवर पाहिं निबिड छायेंत।

हरणें धांवत कैशीं, फटिंतिल किरणां मधेंचि आहेत॥२॥

जवळील ओहळाच्या, मंजुळ आणीक गोड नादानें॥

जातो आहे कैसा, वेगें तो राजहंस डौलानें ॥३॥

आनंद भरित सदनें, किति तरि इंग्लंडनाम देशाचीं॥

आहेत पाहिं तूं त्या, लोकांच्या तीं तशींचि आवडीचीं ॥४॥

---

१ घरें. २दाट.

अग्नीच्या भोंताली, रात्रीं आस सोयरीं जमुन ॥
हास्यविनोदानंदें, गेलीं आहेत तीं कशीं भरुन ॥५॥

## दिंडी.

स्त्रिया कैशा बा मधुर गान गाती ॥
बाळपणाच्या गोष्टी हि सांगताती ॥
बहू काळींचे ग्रंथ वाचिताती ॥
सुस्वरानें किति हर्ष पावताती ॥६॥

## अभंग.

हजारों झोंपड्या पाहा भोंवताल्या ॥
कशा पसरल्या आहेत ह्या ॥७॥
ह्यांच्या भोंवताले ओहोळ वाहाती ॥
ह्मणूं का भासती रुप्याचे हे ॥८॥

---

१ इष्टमित्र. २ हांसण्या खेळण्याचे गुल्लानें.

लहान लहान देवळा भोंवती ॥
वृक्ष ही शोभती फलभारें ॥ ९ ॥
त्यांच्या फटींतून झोंपड्या दिसती ॥
वाटे त्या पाहाती डोकावून ॥ १० ॥
तयांत गरीबें निर्भय निजलीं ॥
वळचणीखालीं पक्षी जैसे ॥ ११ ॥
इंग्लंडाचीं गेहें किती शोभिवंत ॥
स्थानें मूर्तिमंत स्वातंत्र्याचीं ॥ १२ ॥

## आर्या.

या सर्व गृहांमध्यें, होवो चिरकाळ वृद्धि जीवांस ॥
देशाभिमान बुद्धि[1] उपजो रक्षावया स्वदेशास ॥ १३ ॥
या वृक्षवाटिका ही, हिरव्या राहोत वा अशा सतत ॥
आणि तृणावृत राहो, भूमि सदा ही अशीच टवटवित ॥ १४ ॥

१ झाडी. २ गवतानें झांकलेली.

एथील बाळकांचें, मन हरिखो पाहुनी स्वदेशाला ॥
आणिक तसें भजो तें, सर्व सुखानंदकंद देवाला ॥१५॥

---

# ताडाचें झाड. १४

## आर्या.

हा तालवृक्ष हलला, नाहीं पूर्वेकडील देशांत ॥
अर्बस्थानाच्या ही हलला नाहींच सजल भागांत ॥१॥
हिंदुस्थानांतिल ही, सिंधूच्या कोणत्याहि बेटांत ॥
दक्षिणदिग्वायूनें, आला नाहीं कधींच हलण्यांत ॥२॥
त्याची सुंदर छाया, पडली नाहीं कधींच बा अचल ॥
एकीकडच्या खोल हि, उदकावर जाण आफ्रिकेंतील ॥३॥
पण हा देश बहिष्कृत, एथें आहे चि उगवला ताड ॥
भो ताले याच्या बा, जातीचें नाहिं एकही झाड ॥४॥

---

१ आनंदजनक २ देशाबाहेरचा.

पूर्वदिशेकडच्या या, वृक्षाचा मोठा उंच वाढून ॥
गेला वरले वर्नम, झाडाच्या पीन मोहरांतून ॥५॥
याच्या शेवळलेल्या, तळच्या जमिनीवरी कसा पाहा ॥
पडलासे रंग निळा, वासाच्या वायलेट् फुलांचा हा ॥ ॥६॥
हा नाडवृक्ष एथें, अगदीं परकाच सा मला गमला ॥
याच्या समीप सुंदर, शुभ्रजलाचा प्रवाह चालियला ॥ ॥७॥
यावरि उइलोनामक, वृक्षांचा पेर होउनी आहे ॥
लाइम[1] वृक्ष सुवासा, भुलुनी मधमाशि भोंतिगुंगताहे ॥ ॥८॥
व्यजेन[2] समान छाये, मध्यें वा त्यांच नाडवृक्षाच्या ॥
चमका मारित होत्या, दंव पडलेल्या गुलाब पुष्पांच्या ॥९॥
एक्यादिनी सणाच्या, गाण्यांचा फार रंग होऊन ॥
त्याच्या नादानें निशिं[3], गेलें उपवन समग्र तें भरुन ॥ ॥१०॥

---

१ इंग्लंड देशांतील फुलझाड. २ विंझण्यासारिखी. ३ रात्रीं.

पुष्पित शाखांवरुनी, होतेजे फार दीप टांगविले ॥
त्यांचें तेज द्रवांवर, पडुनी बहुरंग त्यांतुनी दिसले॥
॥११॥
सुंदर गोर सुशोभित, नाचत होत्या स्त्रियाहि मोजनें॥
यास्तव जिकडे तिकडे, तें स्थल गेलें भरून शोभेनें॥
॥१२॥
त्या समुदायामध्यें, बसला होता गृहस्थ एकजण॥
त्याचें मन लागेना, त्या सुंदर नाचण्याकडे हि पण॥
॥१३॥
तो धूसर रंगाचा, असुनी होताच बा नदा तरुण॥
काळ्या लांबटऐशा केशांचा तच्छिरीं दिसे भरणा॥१४॥
हिंदुस्थानामध्यें, त्याचा होताचि जन्म झालेला॥
आणि स्वशिरावरतो, होता बा पिच्छमुकुट त्यालेला॥
॥१५॥
त्याच्या चर्येवरुनी, तो दिसला मनिं उदास अगदींच
आणीक त्या समाजीं, दिसला तोडा समान परकीच॥
॥१६॥

---

१ धुकट रंगाचा, २ त्याच्या आकीवर. ३ पंखाचा मुकुट. ४ समुदायां त.

मग तो उठूनि तेथुनि, पिच्छें हलविल हळू पुढें चाले॥
हिरवट ओलिवनामक, झाडें पाहुनि पथीं नतो झाले ॥१७॥
चेसूनटनामक पुष्पें, पाहुनि हा तो न होय सानंद॥
पण ताडतरु पहातां, त्याच्या हृदयीं न माय आनंद ॥१८॥
पर्णध्वनिच्या द्वारें, भाषण त्यानें तपास जें केलें ॥
तें ऐकतांच त्याचें, मौन व्रत तेंहि मोडुनी गेलें॥१९॥
त्या भाषणांत त्याला, स्मृति झाली आपल्याच वेदाची॥
तैशी त्याच्या भोंती, प्रकाशणाऱ्या अशा समुद्राची॥ ॥२०॥
तो पर्णध्वनि त्याच्या, कर्णाला भासला स्वदेशाचा॥
वाटेच त्यांत कांहीं, रवै आहेसा समुद्रलाटांचा ॥२१॥
जेथें वनस्पती बहु, कांठानें दाट उगवल्या होत्या॥
तेथील मातृमंदिर, आठवलें मनिं तदा गृहस्था त्या॥ ॥२२॥

---

१ पानें वाजल्यानें. २ उभ्यानें बसणें ३ शब्द. ४ आईचें घर.

मग त्याच्या भावांच्या, शब्द वल्ह्यांचा पडेच तत्कणीं॥
तीरींच ऐकलेला, शंखध्वनि येइ त्याचिया श्रवणीं[१]॥
ऐसें मनांत येतां, त्याला मोठाचि हुंदका आला॥
कडकड भेदुन नेत्रां, दृक्षातें अश्रु ढाकिता झाला॥२४॥

## श्लोक.

जी शक्ती मरण्यास सिद्ध करिते, देशाभिमानी नरा।
जी उद्युक्त तया प्रतीच करिते, घायास वा संगरा[२]॥
त्या शक्ती आणि हा हि जीस धरुनी नेत्रांबुनें[३] गाळितो।
त्यांचें मूळ समान वास्तव नव्हे निंदेस हो पात्र तो॥
॥२५॥

---

१ कानांत. २ नेत्रोदक. ३ युद्ध.

# तारुण्यदशेंतील उमेदी. १५

## ओंव्या.

ज्ञानाच्या खाणी खणीत ॥ जाऊन शिरावें विद्यादरींत ॥
हिरून घ्यावें आदिशक्तीचें वित्त ॥ ज्ञानभांडार लुटावें ॥ १ ॥
मग त्यांच्या गर्भी प्रवेशुनी ॥ रत्नें काढावीं निवडुनी ॥
राजमुकुटींच्या रत्नाहूनी ॥ ज्यांचें मोल आगळें ॥ २ ॥
धरूनि धर्मपथ अतिउत्तम ॥ सुरळीत चालवावा पुढील क्रम ॥
सदाचार पूर्णसुखाचें धाम ॥ आहे निश्चयें जाणपां ॥ ३ ॥
सद्बुद्धि धरूनि जाण ॥ प्रगट करावें चांगुलपण ॥
तेंचि आहे खरें भूषण ॥ मनुष्याचें निश्चयें ॥ ४ ॥
आपुल्या मनाचें जाण ॥ स्वर्गींच आहे मुख्य स्थान ॥
यालागीं इथेंच करावी सुखभुवन ॥ स्वर्गापरी ॥ ५ ॥

---

१ विद्यार्थ्यांनीं २ सन्मार्ग. ३ घर. ४ स्थान.

## व्यायाम. १६

### आर्या.

चित्त स्वस्थ नसून, व्याधीनें ग्रस्त जाहला काय ॥
जरि तरि पडतिल कामा, देवाच्या थोर देणग्या काय ॥१॥
जो जो पदार्थ घ्यावा, व्याधिष्ठा लागतो विषचव तो ॥
रोगाच्या पायीं वा, सर्व सुखाला हि जीव आंचवे तो ॥२॥
सर्व सुख मात्राला, कारण आहे शरीर संपत्ति ॥
व्यायानें निज रक्षुनि, वागे जरि तरि नवेचि आपत्ति ॥३॥
आयुष्य आपुलें जो, घालवितो व्यर्थ अकसबोंड्यांत ॥
तो सत्वर रोगाच्या, पडतो जाऊन उग्र नरड्यांत ॥४॥
परि जो शरीर अपुलें, व्यायाम करुनि कमावितो खासें ॥

---

१ देह. २ रोग्याला. ३ मुकतो. ४ मेहनतीनें. ५ आळशी पुरुषांत. ६ बळकट करतो.

अवयव सर्वहि हलके, होऊनि मति चालते अनायासें ॥५॥

## नित्य कर्मे. १७

### आर्या.

रेतीचे कण जैसे, एका मागून एक गळतात ॥
काळाचे क्षण तैसे, एका मागून एक पळतात ॥ १ ॥
ऐशा अनुक्रमें क्षण, कांहीं जातात कांहि येतात ॥
त्या सर्वांस धराया, घालुं नको एककाळिं तूं हात ॥ २ ॥
कर्तव्यें जीं कर्मे, वाट तुझी पाहतीं क्रमानें च ॥
यास्तव एकेकावर, तूं अपुली सर्व शक्ति वा वेंच[1] ॥ ३ ॥
पुढली स्वप्नें आणुनि, मनिं तूं जाऊं नको चिंबा फुगुन ॥
घे आज नित्यकर्मा, पासुनि होईल लभ्य[2] तें शिकुन ॥ ४ ॥

---

१ खर्च कर. २ प्राप्त.

तुझिया करितां एथें, एका मागून एक येतात ॥
जे आनंद तयांला, घ्याया कर आपुले पुढें हात ॥५॥
आलेले जातिल तरि, जाऊंदे स्वस्थ तूं सुखेंचि रहा ॥
हळहळ कशास करिसी, सर्व अशाश्वत[१] असेंचि सत्य पहा ॥६॥
ऐशा परीच दुःखें, एका मागून एक येतील ॥
भीती धरूं नको कीं, हीं मजवर एकदांच पडतील ॥७॥
एका मागें दुसरें, ऐशीं दुःखें अनुक्रमें येती ॥
तुजला गांठायाला, अभ्रें[२] जैशीं मही[३]तला वरती ॥८॥

---

## इंग्लंडदेशांतील खलाशी लोक. १८

### आर्या.

इंग्लंडस्थ खलाशा, लोकांना व्हा समोर शत्रूच्या ॥

---

१ नष्ट. २ ढग. ३ पृथ्वीवर.

थोर लढाऊ नौका[1], लोटा आतां जलांत सिंधूच्या[2] ॥१॥
तुह्मी रक्षक आहां, या अमुच्या देशींच्या समुद्राचे ॥
शौर्यहि तुमच्या आहे, वर्णाया जोगनें निशाणाचें[3] ॥२॥
मारुनि थोर लढाया, हजारवर्षें स्वकीर्ति गाजविली ॥
नौकाशास्त्रांत तशी, बहु अपुली दक्षताहि दाखविली ॥
॥३॥
यास्तव तुह्मी लढाहो, जोंवरि चालेल हा महाप्रबल[4] ॥
संग्राम[5] आणि मिळवा, विजयश्री[6] सर्व खर्चुनी स्वबल ॥४॥
आत्मेहि पूर्वजांचे, तुमच्या निघतील या समुद्राच्या ॥
एकैका लाटेंतुन, याया साह्यास पुत्रपौत्रांच्या ॥५॥
कीर्तिक्षेत्र[7] तयांचे, नौका तैशाच सिंधुशावगतां ॥
या वार्त्ता[8] मनि आणुनि, आतां तुह्मीही बा तसे वर्त्ता ॥६॥

---

१ नावा. २ समुद्राच्या. ३ झेंडाचें. ४ मोठा. ५ लढाई.
६ जयलक्ष्मी. ७ कबरस्थान. ८ गोष्टी.

जेथें नेल्सन् आणि, ब्लेक असे थोर वीर पडलेले ॥
तेथें व्हाल तुह्मीही, वीरश्रीनें भरून गेलेले ॥ ७ ॥
इंग्लंडाला मोठे, किल्ले आणीक कोटही नसती ॥
त्याची अद्रिच दूर्मी, वरुनि गाति आणि अर्णवी वसती ॥ ८ ॥
त्यांतील ओकनामक, झाडोंपासुन विजा कडाडून ॥
खालिल शत्रुदलाचा, करिती संहार त्यावरि पडून ॥ ९ ॥
हें संकटाभ्र जाऊन, पुनरपि चमकेल शांतिनक्षत्र ॥
तों झळकोध्वज भीतिप्रद इंग्लंडास जो असे छत्र ॥ १० ॥
त्यासमयीं गानोत्सव, तुमच्या मानार्थ सिंधुवीरांनो ॥
होइल ज्या समयीं हें, संकट पावेल नाश धीरांनो ॥ ११ ॥
यास्तव मोठ्या निकरें, युद्ध करूनीच शत्रुला पळवा ॥

---

१ पर्वतासारख्या लाटा. २ समुद्रांत. ३ ओकाच्या लाकडाच्या नावेपासून. ४ संकटरूप मेघ. ५ शांतिरूप नक्षत्र.
६ समुद्रांतील शूरांनो.

मग मोठ्या संतोषें, विजयश्री आपुल्याकडे वळवा ॥१२॥

---

## बूक. १९

### अभंग.

मी बा पाहीं किती आहें विसंगत ॥
कांहींच जमत नाहीं माझें ॥ १ ॥
मी आहें प्राचीन मी आहें नवीन ॥
असून बंधन मोकळा मी ॥ २ ॥
बहुधा बा माझा सोनेरी पोषाख ॥
फारच उणाख बहुधा तो ॥ ३ ॥
जरीं येत नाहीं वाचनां अक्षर ॥
तरीं मी साक्षर आहें जाण ॥ ४ ॥
जरी मी जातीनें आहें वा आंधळा ॥
इतरांचा डोळा उघडितो ॥ ५ ॥

जसा मजमध्यें सदां काळेपणा ॥
तसा शुभ्रपणा सदां आहे ॥ ६ ॥
आकारामध्यें ही नाहीं कांहीं मेळ ॥
कांकीं मी पातळ आणि जाड ॥ ७ ॥
मला[1] नाहीं मास मला नाहीं हाड ॥
आच्छादन जाड कातड्याचें ॥ ८ ॥
इंग्लंड देशींचा आणि जर्मनींचा ॥
भरतखंडींचा राहणारा मी ॥ ९ ॥
कित्येकांची फार मजवरि प्रीति ॥
आणीक अप्रीति कित्येकांची ॥ १० ॥
बहुधा मी जरी सत्वर[2] मरतों ॥
बहु काळ वांचतों कधीं कधीं ॥ ११ ॥

---

१ झांकण. २ लवकर.

विरामाची चिन्हें जीजी मजमध्यें॥
तीं तीं कोणामध्यें नाहींन वा ॥१२॥
विरामाच्या ठेपी जितक्या मजमध्यें॥
तितुक्या मुरलीमध्यें नाहींतचि ॥१३॥
गंभीर असूनी मी आहें रंगील ॥
म्हणती सकळ जन ऐसें ॥ १४ ॥

---

## मित्रवियोग. २०
### अभंग.

मित्रामागें मित्र सोडितें हें जग ॥
मित्राचा वियोग कोणा नाहीं ॥१॥
एथें नाहीं नेमा जीवांचा संयोग ॥
जयाचा वियोग होणा नाहीं ॥२॥
जन्मलेल्या प्राण्या मृत्यु हा निश्चित॥

सर्व अशा[१]श्वत मृत्युलोकीं ॥ ३ ॥
मेलेल्या नसतें पर[२]लोकीं जाणें ॥
जगणें मरणें सारखेंची ॥ ४ ॥
कुंठीत[३] वा गति काळाची ही जेथें ॥
मृतकाचाही जेथें वा[४]स नाहीं ॥ ५ ॥
निश्चयेचि तेथें आहे सुखस्थान ॥
नाहीं आयु[५]र्मान क्षणिक तेथें ॥ ६ ॥
अग्नीचे स्फु[६]लिंग लोपणारे जैसे ॥
नाहींतचि तैसे भोग तेथें ॥ ७ ॥
ऐसा जो काळोक आहे वा वरता ॥
वियोगाची वार्ता तेथें नाहीं ॥ ८ ॥

---

१ नाश होणारें. २ स्वर्गी. ३ खुंटलेली. ४ वसती.
५ आयुष्य. ६ ठिणग्या.

शाश्वत[1] सुखाची सर्वदा सुवत्ता ॥
सुजना करितां केली आहे ॥ ९ ॥
आणी बा मेलेला भावीक ज्ञनाला ॥
दिसतो गेलेला दिव्य लाकीं ॥ १० ॥
जेसा प्रातःकाळ चढत चि जातो ॥
पूर्णतेस येतो मध्यावरी ॥ ११ ॥
त्याच्यामागें तारा जरी मावळतो ॥
जाऊनी मिळतो तेजामध्यें ॥ १२ ॥

---

## इंचूकेप नामक खडकावरील घांट. २१

### अभंग.

हावेंत नव्हती कांहीं हालचाल ॥

---

[1] नित्य.

नव्हता खळाळ समुद्रांत ॥ १ ॥
तारवांची शीडें नव्हती हालत ॥
कणाही चळन नव्हता बा ॥ २ ॥
मग अर्धांतचि तारूं ही स्थिर ॥
होतें पाण्यावर पडलेलें ॥ ३ ॥
इंचूकेप नामक खडका वरती ॥
लाटाही वाहाती संतपणें ॥ ४ ॥
धोका वसण्याचा रंगही दीसत ॥
नव्हता लाटेंत शब्द जैसा ॥ ५ ॥
वरखाल होत नव्हती बा लाट ॥
हालेना ती घांट इंचकेपीं ॥ ६ ॥
आबर ब्रथक नामक गावांत ॥
धर्मात्मा महंत राहातसे ॥ ७ ॥
त्यानें ती बा घांट बांधीयेली होती ॥

खडकावरती इंच्केपाच्या ॥ ८॥
वादळाच्या वेळीं पाणी जेव्हां फुगे॥
तेव्हां ती तरंगे त्याच्यावरी ॥ ९ ॥
हेलकाव्यांनीं ती पाण्याचा बाडगे ॥
नाद करूं लागे बहू मोठा ॥१०॥
वादळाच्या योगें जेव्हां तो खडक॥
इंचूकेप नामक जळीं बूडे ॥ ११॥
तेव्हां त्या घाटेचे शब्द सूचनेचे ॥
जाहाजवाल्याचे कानीं जात ॥१२॥
तेणेंकरुनीं तो खडक धोक्याचा ॥
इंचकेप नांवाचा त्यांस कळे ॥१३॥
त्यामुळें ते फार आभारी वा होत ॥
आशीर्वाद देत महंतासीं ॥१४॥
इंचूकेप घांटेचा ताफा पाण्यावर॥

बरा काळसर दिसत होता ॥ १५ ॥
रोवर तारवावर चढियेला ॥
तो काळा मजला रोखीयेला ॥ १६ ॥
घांट आणि ताफा दोहोंवरी डोळा ॥
ठेवूनि बोलला रोवर तो ॥ १७ ॥
खलाशी लोकांनों होडी खालीं टाका ॥
इंचकेप खडकांपाशीं चला ॥ १८ ॥
आरब्रोथ ऐथील मोठ्या महंतास ॥
देईन मी त्रास निश्चयेंची ॥ १९ ॥
तारूं काढूनीया वल्हीं मारिता न ॥
आणी ते जातात खडकापाशीं ॥ २० ॥
रोवरानें घांट खडकावरूनी ॥
ओणवा होऊनी तोडीयेली ॥ २१ ॥
तेव्हां ती गरगर शब्द करूनीया ॥

तळीं जाऊनीयां बैसली बा ॥ २२ ॥
बुडबुडे तेव्हां वर फार आले ॥
फुटूनीयां गेले चहूंकडे ॥ २३ ॥
ऐसें करूनीयां रोबर बोलला ॥
आतां महंताला आरब्रोथाच्या ॥२४॥
नाहीं मिळणार दुसऱ्यापासून ॥
आशीर्वाद जाण पुढें कधीं ॥ २५॥
इकडे तिकडे फिरला रोबर ॥
पाण्यांतून फार दीस लोभें ॥ २६॥
लुटीच्या द्रव्यानें गबर होऊन ॥
जाई मार्ग धरून स्काटलंडाचा ॥२७॥
धुकें आकाशांत फारची चढलें ॥
तेणें दृष्टी नीलें सूर्यबिंब ॥ २८ ॥

---

१ नाहीं आलें.

सगळा दिवस वारा बा वाहीला ॥
परी तो पडला संध्याकाळीं ॥ २९ ॥
ऐकूं येत नाहीं लाटा रोरावतें ॥
काय तूज आतां ऐक बोले ॥ ३० ॥
मला वाटतें बा समुद्राचें तीर ॥
नाहीं फार दूर एथूनीया ॥ ३१ ॥
आतां कोठें आहों नाहीं सांगवत ॥
असती वाजत घांट आंतां ॥ ३२ ॥
तरी बरें झालें असतें आमूचें ॥
आतां काय त्याचें बोलूनीया ॥ ३३ ॥
काहीं शब्द नाहीं त्यास ऐकूं आला ॥
फुगारा चढला उदकास[1] ॥ ३४ ॥

---

१ पाण्यास.

वारा जरीं होता अगदीं पडला ॥
जलप्रवाहाला लागलें तें ॥ ३५ ॥
तें तारूं वाहात वाहात चाललें ॥
आणि अडकलें खडकाला ॥ ३६ ॥
तोचि वा खडक इंचकेप नामक ॥
करणी अलौकीक ईश्वराची ॥ ३७ ॥
रोवरें आपुले केस उपडले ॥
आपणा निंदीलें निराशेंत ॥ ३८ ॥
चोहीं कडूनीही लाटा आंत आल्या ॥
तळीं नेल्या झाल्या नारवास ॥ ३९ ॥
लोकांचे वाईट जे नर इच्छीती ॥
त्यांची होते गती ऐशा परी ॥ ४० ॥

## उद्योग. २२

### आर्या.

भगवत्संकेत[1] असा, दिसतो सर्वहि मनुष्यजातीनें ॥
सृष्टिक्रम रक्षाया, श्रम केले पाहिजेत जातीनें ॥१॥
अळशी व्हावें म्हणूनी, सांग मला कोण जन्मला आहे॥
कांहीं ना कांहीं तरि, उद्योगातें मनुष्य करिताहे ॥२॥
लोक कितिएक पहा, कृषिकर्मातें करीत आहेत ॥
कितिएक ऐरणीवर, बसले आहेत घाव मारीत ॥३॥
कित्येक माग लावुनि, पाहा कैसे बहूत जलदीनें ॥
धोटे फिरवुनि सूत्रें, वस्त्रांची बसवितात युक्तीनें ॥४॥
भरती होटी वारे, यांची माहिति करून घेऊन ॥
व्यापारार्थ किती वा, फिरती सर्वत्र सागरांतून ॥५॥

---

१ परमेश्वराचें मनोगत. २ मनुष्य मात्राचें ३ व्यवहार.
४ वस्त्रां.

हातांनीं पायांनीं,करिती कित्येक फार दुःसाध्य ॥
कामें कौशल्याचीं,उद्योगातें करून जीं साध्य ॥६॥
ज्यांची बुद्धी सदसत्,विचार करण्यास योग्य बा होते॥
भाषण विचार यांच्या,द्वारें करितात साह्य अन्यांतें॥७॥
[1]प्रत्येक कष्टतो जरि,अपुला अपुलाचि अर्थ लक्षून॥
तरि सर्व जनाचें हित,बहु होतें जाण त्याजपासून॥८॥
जन्मूनि एकमेकां,वरि जरि उपकार लोक करतील॥
तरि बा परस्परांचे,उपकार अनुक्रमेंचि फिटतील॥ ॥९॥
राजाचा जो होतो,भोजन विस्तार थाट माटाचा ॥
त्या करितां तो आहे,उपकारी शेतकाम कर्त्याचा ॥१०॥
तो अपुल्या आंगावर,करितो जो राजकीय पोषाग ॥
तो त्याजला मिळाया,कारण आहे खचीन बा मांग ॥ ॥११॥

---

१ हरएक मनुष्य. २ लाभ. ३ पाहून. ४ वस्त्रें विणण्याचें यंत्र.

गवड्याचे श्रम त्याला, कडक हवेपासुनीच रक्षीन ॥
नाहीन काय त्याला, लोहाराची कृतीहि शोभविता॥१२॥
हे सारे राजाचें कार्य करूनी स्वधर्म जागविती ॥
राजा ही जिनगीला, त्यांच्या रक्षूनि पाळितो नीती॥१३॥
राजाच्या सत्तेनें, सर्वाला आपुल्या प्रयासाचें ॥
फळ मोठ्या आनंदें सांपडतें भोगण्यास हें साचें ॥१४॥
ऐशापरीच सर्वहि, राजापासून रंकपर्यंत ॥
उद्योगाच्या योगें, निश्चित होतात सर्व धनवंत ॥१५॥

---

१ तरवार इत्यादि पदार्थ. २ श्रमाचें. ३ गरीब.

# मेलेल्या मुलाच्या सुंदर पुतळ्यावरून सुचलेली गोष्ट. २२

## अभंग.

बाळा म्यां तुजला साजीरें गोजीरें॥
जीवंतपणीं रे पाहीयेलें ॥ १ ॥
स्व संतोषें रानीं उडतां पाडस ॥
दीसतें नेत्रास रम्य जैसें ॥ २ ॥
तैसें तूं होतेंस बाळक देखणें ॥
आणि गोजिरवाणें तयेंकाळीं॥ ३॥
आपूला आरसा धुंडीत होतेंस ॥
सगळा दिवस एकेवेळीं ॥ ४ ॥
जेव्हां तो आरसा दृष्टीस पडला॥
तेव्हां झाला तूला हर्ष फार ॥ ५ ॥
जेव्हां त्या हर्षाची उकळी फुटली ॥

ह्या नादावली भोंवालींची ॥ ६ ॥
म्यां तुज पाहिलें सुंदरा ज्यावेळीं ॥
बहीण जवळी होती तूझी ॥ ७ ॥
दिसली ती मला कमळाची जात ॥
आणि टवटवीत गुलाब तूं ॥ ८ ॥
त्या वेळीं म्यां तूझी आई हा पाहीली ॥
धन्यता दिसली नेत्रीं तीच्या ॥ ९ ॥
तिचा तो आनंद पाहूनी मी भ्यालें ॥
दुःखानें भाजलें होतें म्हणुनी ॥ १० ॥
तुझ्या मातोश्रीच्या कुरळ्या केशांत ॥
बा होता शोभन एक हात ॥ ११ ॥
दुसऱ्या हातानें ओढीत होताली ॥
तिच्या पदरासी मौक्तिकांच्या ॥ १२ ॥
त्याची वोढ जेव्हां बैसली निजला ॥

धमकाविलें तुला हांसनची ॥१३॥
आणीक मजला उमगेना कांहीं ॥
बाळक कीं आई गोजिरवाणी ॥१४॥
आतांही पाहाते तुजला गोजीरें ॥
निवांतवाणी रे झोंप घेतां ॥१५॥
पण तुझ्या नेत्रीं काय हा फरक ॥
नाहीं बा चमक काडीभर ॥१६॥
भिंवयाही तुझ्या नाहीं बा फिरत ॥
हालत नाहींत ओंठ तूझे ॥१७॥
बाळा तूझें रूप सुंदर दिसतें ॥
केश ही शिरातें शोभवीती ॥१८॥
उद्योगीं हीं तुझीं बोटें विमुकलीं ॥
आहेत ठेवलीं ऊरीं तूझ्या ॥१९॥

---

१ हंसण्यास.

पण आतां तूझें मौजेचें नाचणें ॥
आणीक पळणें संपलें बा ॥ २० ॥
बाळा तुझी यात्रा या मृत्युलोकांत ॥
थोड्याच काळांत आटपली ॥ २१ ॥
जैसें तूं सुंदर पूर्वी दिसलेंस ॥
तैसें दिसतेस आजूनही ॥ २२ ॥
आरशांत पूर्वी प्रतिबिंबें दोन ॥
दिसलीं आतां ऊन एक दीसे ॥ २३ ॥
तुझें बाळा आतां हांसणें खेळणें ॥
लाडकें बोलणें बंद झालें ॥ २४ ॥
तुझें घर आतां उदास दिसतें ॥
भरलें जें होतें आनंदानें ॥ २५ ॥

---

पडलाया २. कमी.

परिपाठांतील या स्थलावरतें ॥
अचल दिसतें रूप तुझें ॥ २६ ॥
पण गाडिवरें व्यापलें म्हणूनि ॥
नाहीं या नयनीं पाहावत ॥ २७ ॥

---

## चमत्कारिक न्याय २४

### ओंव्या.

नासिका आणि नयनें[1] ॥
यांमध्यें अतिविलक्षण ॥
वाद पडला अपनेपानेरून[2] ॥
तें कोणाचें म्हणूनी ॥ १ ॥

---

१ डोळे. २ चष्मा.

तैं जिव्हामध्यस्थ होऊन ॥
उभयपक्षांचें करी प्रतिपादन ॥
विद्यामुकुट धारण करून ॥
न्यायोक्तीनें दाऊनी ॥ २ ॥
शोधून काढाया वास्तवसार ॥
जे कर्ण विख्यात धुरंधर ॥
ते बैसले करावया विचार ॥
जिव्हा प्रणीत गोष्टींचा ॥ ३ ॥
प्रथम नासिकेचा पक्ष धरून ॥
जिव्हा बोले आदरें करून ॥
तिचा भोगवटा चिरकालापासून ॥
आहे उपनेत्रीं निश्चयें ॥ ४ ॥

---

१ आश्र. २ संभाषण. ३ विद्याभूषण. ४ खरासारांश. ५ विचार चतुर. ६ प्रतिपादन.

जिव्हा उचलूनि उपनेत्रासी ॥
दावी सर्व सभासदांशी ॥
पहा याचा मध्य नासिकेसी ॥
बैसो ऐसा केलासे ॥ ५ ॥
अभ्रपृष्ठीं[1] जैसें जीन ॥
तैसें नाकीं बसावें चिकटून ॥
ऐसा घाट केल्यावरून ॥
उपनेत्र दिसतें तियेचें ॥ ६ ॥
दुसरी विनंती स्वामीस ॥
आहे पारिसावी तीस ॥
कीं नासिका नसती मुखास ॥
कोण या धरितें उपनेत्रा ॥ ७ ॥

---

१ आकाशाच्या पाठीवर.

या स्फयुक्त कारणावरून ॥
त्वां मास येईल स्पष्ट दिसून ॥
कीं उपनेत्र निश्चयें करून ॥
नासिकेचेंच म्हणूनी ॥ ८ ॥

मग नासिका पक्ष सोडून ॥
तत्काळ बोलणें फिरवून ॥
नेत्राकडचा पक्ष धरून ॥
जिव्हा बोलूं लागली ॥ ९ ॥

पक्ष फिरविण्याचें कामांत जाण ॥
चतुर असती न्यायनिपुण ॥
परि नेत्रपक्षाचें कारण ॥
सुयुक्त नदिसे तितुकें पैं ॥ १० ॥

---

१ उघड.

तीं कारणें [illegible] कल्यांस ॥
पडलीं नाहींत पसंतीस ॥
म्हणून गा प्रसिद्धीस ॥
लोकीं आली नाहींत ॥११॥
दोहों पक्षांचें भाषण ॥
न्यायाधीश घेती ऐकून ॥
निर्णय केला गांभीर्यें[1] करून ॥
किंतु[2] न राही ऐसाची ॥१२॥
दिवसां अथवा रात्रीस ॥
जें नासिका वापरील उपनेत्रास ॥
तें नेत्रांनीं स्वतां आपणास ॥
झांकून घ्यावें सर्वदां ॥१३॥

---

१ स्थिर मनानें. २ संशय.

# काजव्याविषई

## आर्या.

फिरतो जो कुपणाच्या, खालीं अथवा समीप उदकाच्या॥
तो कीटक रात्रीचा, बहु चमका मारितो उजेडाच्या॥१॥
त्याचा प्रकाश दिवसां, उजडीं अगदींच लोपुनी जातो॥
उत्पत्तिवाद ज्याचा, मिटला नाहींच आज पावेतों॥२॥
कितिएक मस्तकाच्या, पासुनि निघतो असेंचि म्हणतात।
कितिएक शेपटीच्या, पासुनि निघतो असेंचि वदतात॥३॥
पण हें खरें निशाज्या, हस्तानें अंबरा प्रकाशवितें॥
त्यानेंच ती नयाला, माफक देऊनि तेज शोभवितें॥४॥
ईश्वर सुचना करितो, ऐसें कीटास तेज देऊन॥
पांथोला कीं तुम्हीं, चालावें फार लक्ष्य देऊन॥५॥

---

१ आकाशास. २ थाटसहित.

नाहीं तर पायांखीं, [illegible] कीट तुडवेल ॥
ज्याचें तेज तुम्हांला, पडतें कामास रात्रिं बहुवेळ ॥ ६ ॥
प्रभुसंकेत कसाही, असला तरि हा खराच तत्वार्थ[1] ॥
कीं तो प्रकाश दिधला, कीटाला ईश्वरेंहि कार्यार्थ ॥ ७ ॥
मोठेपणा मिरवितो, कीटहि दावुन खदीप रत्नास ॥
ही गोष्ट बोधकारक, होवो वा श्री मदांधलोकांस ॥ ८ ॥

---

## परस्परानीं परस्परांवर दया करणें हा मुख्य स्वाभाविक धर्म. २६

### ओंवी.

आंद्रोक्लीज जया अभिधान ॥
तेणें केला स्वामिद्रोह[2] जाण ॥
म्हणून तयापासून मरण ॥
जाणून पळाला भीतीनें ॥ १ ॥

---

१ खरा अर्थ. २ [illegible].

लिबियन रानांतून । वस्तृत ॥
वालुकामय प्रदेशांत ॥
येऊन पातला तो त्वरित ॥
मोठ्या वेगें करूनी ॥ २ ॥
मार्ग चालतां चालतां व्याकुळ ॥
झाला तीव्रोष्णें अतिविव्हळ ॥
परि तया दिसला शीतळ ॥
अति विमळ आश्रम ॥ ३ ॥
तेथें जाऊन स्वशरीर ॥
विश्रांत्यर्थ पसरी धरणीवर ॥
तंव भला मोठा सिंहवर ॥
आला तेथें त्याकाळीं ॥ ४ ॥

---

१ कडक उन्हानें. २ घर. ३ सुंदर. ४ श्रेष्ठ.

प्रचंड[1] [illegible] ॥
जवळ येऊं पाहे त्वरितें[2] ॥
परि त्यांत मी रोगग्रस्त ॥
ऐसें दर्शवुनी येमसें ॥ ५ ॥
अतिदीनवाणें तोंड करून ॥
आपुला पंजा उचलून दावून ।
जो मार्गी भेटेल त्यापासून ॥
सहाय मागूं लागला ॥ ६ ॥
तो पळून आलेला गृहस्थ ॥
कांहीं वेळ झाला भयत्रस्थ ॥
म्हणून भयभीत सहस्त ॥
पुढें कराया धजेना ॥ ७ ॥

---

१ मोठी. २ लवकर.

मग होऊन [illegible] धीट ॥
जाऊन सिंहाच्या निकट ॥
पंजा पाहे निरखून नीट ॥
तो तीक्ष्ण कंटक देखिला ॥ ८ ॥
मग तो काढिला उपटून ॥
पूयरक्त पुसून टाकून ॥
मुक्त केला दुःखापासून ॥
सिंह उभा राहीला ॥ ९ ॥
प्रत्यही[1] सिंह जाऊन वनास ॥
भक्ष्य शोधून आणी त्या स्थळास ॥
त्यांतील भाग स्वामिभ्रास ॥
देऊन स्वयें तोषवी ॥ १० ॥

---

१ दरवाजा

मनीं ति[illegible]रून ॥
अपक्क असतांही घेऊन ॥
भूमीवरी तया ठेवून ॥
सिंहास भागी होतसे ॥ ११ ॥
ऐशा प्रकारें कालक्षेप करून ॥
आयुष्य घालविणें विदेशीं राहून ।
याहून स्वदेशीं स्वामीपासून ॥
मरण बरें वाटलें ॥ १२ ॥
जें गृह मनुष्याचें जन्मस्थान ॥
तेथें जावया धांवतें मन ।
जरी मरण प्राप्त होणार जाण ॥
निश्चयें असलें तरीही ॥ १३ ॥

---

१ कंटाळा.

तो घरीं [illegible] ॥
स्वामी शिक्षा ठरवी अघोर[1]॥
कीं त्याचें खाववावें शरीर॥
सिंहाकरीं कडोनी ॥ १४ ॥
मग मोठ्या वाळवंटावर ॥
लोकें समाज[2] जमला फार॥
आंड्रोक्लीस त्यासमोर ॥
उभा केला निर्दयपणें॥१५॥
तों कर्मधर्म संयोग ॥
पाहा कैसा आला योग ॥
त्याचें भक्षावया सर्वांग॥
तोचि सिंह सोडिला॥१६॥

---

१ मोठी. २ समुदाय.

तो सक... ...आक्रांत॥
सांपळ्यांतून आला धांवत ॥
जाऊन पडे तो अतित्वरित ॥
आपुल्या इष्टभक्ष्यावरि॥१७॥
तया पाहातां ओळखिलें त्वरित।
कीं जेणें आपणास केलें दुःखमुक्त[1]।
तोचि हा गृहस्थ निश्चित ॥
आहे म्हणूनी त्याकाळीं॥१८॥
मग थोडी विश्रांती[2] घेऊन॥
त्याचे सर्व उपकार आठवून॥
आपलें चित्त स्वस्थ करून॥
पायां लागे तयाच्या ॥ १९ ॥

---

१ दुःखापासून सोडिवलें. २ थांबून.

ऐसा हा अद्भुत चमत्कार पाहून॥
आश्चर्यभरित झाला सर्वजन॥
तेव्हां आंद्रोक्लीज पुढें होऊन॥
बोलता झाला येणेंपरी॥२०॥

अहो सर्व रोमनगरीस्थ[1]॥
कां झाला इतके तटस्थ॥
उपकारबुद्धि सर्व हृदयस्थ॥
आहे जाणा निश्चयें॥२१॥

प्रथम मनोदेवता सांगे तयास।
की शत्रूस चावून फाडायास॥
मग तिणेंच सांगितलें तयास॥
रक्षावया मित्रांतें॥२२॥

---

१ रोमनशहरांत राहाणारे

# श्लोक.

सूची लहान कितिही असली तरीती ॥
माझ्याहुनी वरीच जाड खरोखरी ती ॥
तीचा जना मजहुनी उपयोग भारी ॥
या साठीं मोल मजला कमतीच भारी ॥१॥

# आर्या.

जितकी वासर[1] संख्या, भरते एक्यात वत्सरा[2] मध्यें ॥
तितकी अमुची संख्या, मिळते पैशांत आपणा[3] मध्यें ॥२॥
उपयोग फार नसुनी, जरि आहे मोल आमुचें स्वल्प ॥
तरि उत्पन्न कराया, श्रम आम्हां पुरत नाहीं वा अल्प ॥३॥
मूळापासूनि शेवट, पावेतों वा तयार करण्यास ॥
कारागीर हि थोडे, लागत नाहींत दक्ष आम्हांस ॥४॥

---

१ दिवससंख्या. २ वर्षांत. ३ बाजारांत. ४ थोडा. ५ निपुण

तितुकतो धातूला, ज[illegible] एकजण ॥
दुसरा तार रसाची, करितो देतां न जाऊं एककण ॥५॥
तिसरा तुकडे करितो, कातर घेऊनि हातींतारीचे ॥
चवथा नयांस करितो, घांसुनि घांसुनि समान लांबीचे ॥६॥
या सर्वांच्या वस्ती, बसवायासाठीं पांचवा करितो ॥
डोकीं सुरेख वर्तुळ, आणि सहावा तयांस तीं जडतो ॥७॥
कानस आणि हातोडा, हातीं घेऊनि सातवा करितो ।
टोकें नीट नयांचीं, आणि समाप्तीस काम पाववितो ॥८॥
इतक्या आयासानें होतो जो वा पदार्थ निष्पन्न[1] ॥
सांगेल कोण त्याचें, नाम मला पुरुषबुद्धिसंपन्न[2] ॥९॥
हें कोडें माझें तूं, जर बुद्धि खर्चुनी उकलशील ॥
तरी तूं निश्चित अपुल्या, आयासात्तन फळाच घेशील ॥१०॥

---

१ उत्पन्न. २ बुद्धिमान.

## आर्या.

एप्रिल महिना आहे, तंववारिक रेशमी किडा निघतो
सर्व हिंवाळ्या भरतो, सौख्यानें आपुल्या गृहीं असतो। ॥१॥
या सर्व ऋतूं मध्यें, त्याला भक्षण करावया मिळतें ॥
पान तुतिचें ज्याला, खावें तितकें पुरून ही उरतें॥२॥
कारण वाढ तयाची, पूर्णावस्थेस एकदां आली ॥
म्हणजे तो खातांना, कोणाला दिसत नाहिं त्याकाळीं॥३॥
जैसा तो खातांना, लोकांच्या पडत नाहिं दृष्टीला ॥
तैसाचि उपोषित ही, त्याकाळीं दिसत नाहिं सृष्टीला॥४॥
त्याचि अवस्थेमध्यें, धंदा आरंभितोचि तो अपुला ॥
तंतूंस विणुन काढुन, वेष्टुन घेतोच तो आपुल्या वपुला॥ ॥५॥

---

१ पृथ्वीतील लोकांला. २ वारीराला.

आणिक हवींतल्या [illegible] वर्तुळें रचुन ॥
अपुल्या भोंतीं करितो, कोश मजेचा सुरेख बा विणुन॥६॥
जरि कोश तलम भारी, असतो तरि सूक्ष्मदृष्टिच्यालाही॥
त्यांतूनि दिसत नाहीं, अंतर्गत वस्तु त्यांतली कांहीं॥७॥
ऐशापरि अपणाला, घेतो तो कीट वेष्टुनी जेव्हां ॥
समजावेंचि तयाचें, काम समाप्तीस पावलें तेव्हां ॥८॥
जरि तो कीटक असतो, जेव्हां तो दिसत नाहिंसा होतो॥
तरि पडतां बाहेरी, सुंदरपक्षी दिसून येतो तो ॥ ९ ॥
मग तो अंडीं घालुन, कीटांची पुरवणी बहू करितो ॥
पुढल्या वर्षाकरितां, नंतर जाऊन शेवटीं मरतो ॥१०॥
जर ह्या भूगोलावर, ह्या कीटासारिखे इतर असते ॥
कीटक उपयोगाला, लोकांच्या फार या जगा पडते॥११॥

---

१ घर. २ बारीक ३ बारीक पाहाणाऱ्याला

## निरूपण [illegible] आहे. २९

### श्लोक.

लाहान थोर दिसती कुसुमें विचित्र ॥
रानीं तशीं उपवनीं परि पाहिं चित्र ॥
यांतील एकही नसेचि न दे रसास ॥
उद्योग शालिनि अशा मधुमक्षिकेस ॥ १ ॥

### आर्या.

जरि चौर्य कर्म करुनि, सर्व फुलांतिल रसास ती हरिते ॥
तरि युक्तिनेंच अपुल्या, कर्माची खूण नाहिंशी करिते ॥ २ ॥
इतक्या चतुराईनें, पुष्पांतील रस हरून ती घेते ॥
कीं त्यांच्या गंधश्री, पावत नाहींत कांहिं उणिवेतें ॥ ३ ॥

---

१ फुलें. २ अनेक रंगाचीं. ३ बागेंत. ४ आश्चर्य. ५ मधुरस.
६ मेहनत करणाऱ्या.

दिसति अन्य किडे कुसुमांतरीं ॥
अरि मला गमतातचि ते तरीं ॥
बहुतकाळ तयांतचि राहुनी ॥
करिति नाश तदंगचि खाउनी ॥४॥

## आर्या.

ऐसे शुक काकादिक, पक्षी आहेत शत्रु कुसुमांस ॥
ते त्यांचा प्राण हरूनि, आनंदें भक्षितात तन्मांस ॥५॥

## श्लोक.

ऐशापरी कुसुमनाश विनाशकारी ॥
आहेत पक्षि आणि कीटक शत्रु भारी ॥
चोरूनि माशि जरि तो मकरंद नेते ॥
सर्वांशि मेण आणि गोड मधाशि देते ॥६॥

---

१ शत्रु. २ त्यांचा. ३ त्याचें आंग. ४ फुलांचा नाश. ५ पुष्परस.

मोठा रसायनज्ञहि, जरि बा घेईल फार आयास ॥
तरि न शकेचि कधींही, पदार्थ उत्पन्न हा करायास॥७॥
व्हावें तितकें तिजला, चोरूं दे वा तिचेंच मध्वन्न ॥
जरि हें न घडेल जगीं, तरिं मधु होणार नाहिं उत्पन्न॥८॥

---

## गोगलगाय. ३०

### आर्या.

गोगलगाय चिकटुनी, असते फळभिंत पर्ण तृण घांस॥
जणु स्वगृहासह तेथें, वादलि म्हणुनी न भी पळायास॥१॥
वादळ आणिक दुसरी, ज्या वेळी भीति येउनी पडते ॥
त्यावेळीं ती अपुल्या, गेहामध्येंच झडकरी शिरते॥२॥

---

१ रसमिश्रणविद्या जाणणारा. २ श्रम. ३ मध. ४ मधुरूप अन्न. ५ आपुल्या घरास. ६ भय.

स्पर्शा तिच्या [illegible] कोणीहि असे जरी ॥
संकोचुनि देहानें, घेते ती आपुल्या स्थळांच तरीं ॥२॥
जेथें तिचें रहाणें, तेथें वसते सदैव एकलिच ॥
तिचि चीज वस्तु आणिक, जडिबुद्धी[6] काय ती तिची नीच ॥४॥
आयुष्य असें अपुलें, वानप्रस्था[7] समान घालविते ॥
भोजन नको दुज्यासह, दुसरा येतांचि शीघ्र[8] संपविते ॥५॥
ती आणि गृहतीचें[9] यांचा बा एक जीव जाणु नही ॥
जो शोधितोचि तिजला, जाणावा अंध आंधळ्याहुनही ॥६॥
मोठ्या आयासानें[10], सांपडलें गेहही जरी तीचें ॥
तरि होत नाहिं दर्शन, बा त्या गेहांत ही गृहपतीचें[11] ॥७॥

---

१ शिंगाला. २ थोडा. ३ आवरून. ४ शरीरानें. ५ राहणें.
६ जिंदगी. ७ वनांत राहणाऱ्या सारखें. ८ लवकर. ९ घर. १० श्रमानें.
११ गृहपतीचें.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | ४ | नाही. | नाहिं |
| | ८ | कंधिं | कधीं |
| ४ | ८ | जरि | तरि |
| १३ | ८ | सुवर्ण | स्वपर्ण |
| २६ | १ | हा ध्वनि | हा बा ध्वनि |
| २६ | ८ | केली | भारिली |
| २८ | २ | प्रकाशाला | प्रकाराला |
| २९ | ६ | प्रेतासन | प्रेतासभ |
| ३१ | ३ | पावूनियां | पावूनि या |
| ३५ | १० | पाहिली | पाहिली |
| ३६ | ४ | वाजऊं | वाजवूं |
| ४० | १ | लागलो | लागला |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ४० | ८ | तलवारिला | तलवारीला |
| ४१ | १२ | हाहिं | हाहीं |
| ४३ | ५ | जानीमध्यें | जातीमध्यें |
| ४३ | ११ | बांधियेलें | बांधिलें |
| ४७ | १ | तीं | ती |
| ४७ | ३ | पाठीं | पाठी |
| ५० | ५ | बाचिंताती | वाचिताती |
| ५४ | २ | दंबावर | दयावर |
| ५४ | ९ | त्यांचा | त्याचा |
| ५९ | १ | होऊनि | होऊन |
| ६२ | ४ | गति | गती |
| ६६ | १० | काळोक | का लोक |

| | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| | ४ | पाण्याचा | पाण्यांच्या |
| | ८ | घाटेचे | घांटेचे |
| ६९ | १३ | आशिर्वाद | आशीर्वाद |
| ७१ | ११ | स्काटलंडाचा | स्काट्लंडाचा |
| ७२ | १ | सगळां | सगळा |
| ७२ | ३ | रोरावंत | रोरावतां |
| ७२ | ४ | ऐक | एक |
| ७४ | ३ | म्हणूनी | म्हणुनी |
| ७८ | ११ | होतो | होता |
| ८३ | ४ | बैसो | बैसे |
| ८३ | १० | परिसावो | परिसावें |
| ८९ | १० | भयत्रस्थ | भयत्रस्त |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९० | ६ | पूस्न | पुसून |
| ९२ | ७ | [illegible] | [illegible] |
| ९५ | २ | बरीच | [illegible] |
| ९५ | ४ | साठीं | साठिं |
| ९६ | १ | वितुकती | वितुकविती |
| ९६ | ३ | हातीं | हातिं |
| ९६ | ५ | साठी | साठि |
| ९६ | ७ | हातोडा | हतोडा |
| ९७ | ४ | तुनिचें | तुनीनें |
| ९७ | १० | ताआपुल्या | आपुल्या |
| ९९ | ५ | करुनि | करुनी |
| १०२ | १ | अल्प | हकुन अल्प |
| १०२ | ७ | आणि | आणी |